# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. १७ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - ११५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सुविचार

यश अचानक मिळत नाही; सातत्य, परिश्रम, संयम आणि प्रामाणिक प्रयत्नांची रोजची पुनरावृत्तीच शेवटी माणसाला त्याच्या ध्येयापर्यंत पोहोचवते आणि आत्मविश्वास मजबूत करते.

## कार्यालयावर दगडफेक

**धुळे:** महापालिका निवडणुकांचे निकाल हाती आले आहेत. या निकाला दरम्यान एक धक्कादायक घटना समोर आली असून, धुळ्यात निवडणूक हारलेल्या एका भाजपच्या उमेदवाराने थेट भाजपच्याच कार्यालयावर दगडफेक केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात भाजपच्या दोन महिला नेत्या गंभीररीत्या जखमी झाल्या आहेत.

## सारांश वृत्त

### मनसेच्या इंजिनाला मुंबईत ब्रेक

**मुंबई :** संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे निकाल हाती येत असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) मुंबईतील अनेक महत्त्वाच्या प्रभागांमध्ये विजयाचा झेंडा फडकवला आहे. आतापर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार, मनसेचे ६ उमेदवार विजयी झाले असून यात महिला उमेदवारांचे वर्चस्व पाहायला मिळत आहे. मनसे एकूण ९ जागांवर आघाडीवर आहे. मनसेला ६ जागांवर विजय मिळाला असून यामध्ये महिला उमेदवारांचा समावेश आहे.

### बीएमसीमध्ये एमआयएमची एन्ट्री

**मुंबई :** मुंबई महापालिकेची मतमोजणी आता अखेरच्या टप्प्यात आल्याचे चित्र आहे. मुंबई महापालिकेत शिवसेनेची २५ वर्षांची सत्ता जाणार असल्याचे चित्र आहे. तर, दुसरीकडे भाजपा महायुतीचा महापौर होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईच्या निकालात मोठा उलटफेर दिसत असून एमआयएमने चांगलीच मुसंडी मारली आहे. मुस्लिमबहुल भागात एमआयएम विजयी झाल्याने मुंबईतील राजकारणात उलथापालथ होण्याची चिन्हे आहेत. एमआयएमने १३ महापालिकांमध्ये अस्तित्व भक्कम केले असून, त्यांचे तब्बल ९५ नगरसेवक विजयी झाले आहेत. अनेक शहरांत त्यांनी प्रस्थापित समाजवादी पक्षाला मागे टाकले आहे.


### राज ठाकरेंचा नाशिकमध्ये एकच शिलेदार विजयी

**मुंबई :** ठाकरे बंधूंच्या युतीनंतर नाशिकमध्ये भव्य सभा घेऊन वातावरण तापवण्यात आले होते. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकाच व्यासपीठावर दिसल्यानंतर मनसे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले होते. नाशिक महापालिकेच्या निवडणुकीत मनसेच्या उमेदवारांपैकी केवळ एकाला विजय मिळाला असून उर्वरित ठिकाणी पक्षाला पराभव स्वीकारावा लागला आहे.

## मुंबईत ठाकरेंचा बालेकिल्ला उद्ध्वस्त; पुण्यासह पिंपरी-चिंचवड पालिकाही ताब्यात

# चांदा ते बांदा भाजपा; २१ महापालिकांत महा-विजय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल हाती आले असून महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने (भाजपा) एकहाती वर्चस्व गाजवत विरोधकांना धूळ चारली आहे. मुंबईसह राज्यातील तब्बल २१ महापालिकांवर भाजपचा झेंडा फडकला असून, शिवसेना आणि काँग्रेसला केवळ बोटावर मोजण्याइतक्याच जागांवर समाधान मानावे लागले आहे. मुंबईतील २५ वर्षांपासूनची सत्ता शिवसेनेला गमवावी लागली आहे.

महाराष्ट्राच्या शहरी राजकारणात भाजपने धुमाकूळ घातला आहे. इचलकरंजी, पुणे, धुळे, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, पनवेल, उल्हासनगर, मीरा-भाईंदर, नाशिक, नागपूर, नांदेड, सांगली आणि जालना या तब्बल १३ महानगरपालिकांमध्ये भाजपने एकहाती सत्ता मिळवत आपले राजकीय वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. इचलकरंजीपासून नागपूरपर्यंत, नाशिकपासून नवी मुंबईपर्यंत भाजपचे झेंडे फडकताना दिसत आहेत.

या निकालांमुळे राज्यातील राजकीय समीकरणात मोठी उलथापालथ झाली आहे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रभावाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

विश्लेषकांच्या मते, या ऐतिहासिक विजयामागे फडणवीस यांच्या नियोजनाची आणि धडाडीच्या नेतृत्वाची महत्त्वाची भूमिका आहे. प्रत्येक शहरातील स्थानिक प्रश्नांकडे लक्ष देत, रणनीती आखणे, प्रचारसभा घेणे, आणि जनतेशी संपर्क साधणे यामुळे भाजपला ही मोठी कामगिरी करता आली आहे. राज्यात सध्या भाजपाची लाट असल्याचे निकाल, मतमोजणीच्या कलावरून स्पष्ट होत आहे. मुंबईसारख्या महत्त्वाच्या महापालिकेसह पुणे, नागपूर आणि नाशिक या मोठ्या शहरांमध्येही भाजपने आपली सत्ता कायम राखली आहे. भाजपची सत्ता असलेल्या महापालिका: मुंबई, नवी मुंबई, मीरा भाईंदर, उल्हासनगर, पनवेल, पुणे, पिंपरी चिंचवड, इचलकरंजी, सांगली मिरज कुपवाड, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर, अकोला, अमरावती, नाशिक, धुळे, जळगांव, अहिल्यानगर (अहमदनगर), जालना, नांदेड वाघाळा आणि छत्रपती संभाजीनगर.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने ठाणे आणि कल्याण-डोंबिवली या आपल्या हक्काच्या बालेकिल्ल्यांमध्ये वर्चस्व टिकवून ठेवले आहे. या दोन महत्त्वाच्या महापालिकांवर शिवसेनेचा भगवा कायम आहे.

काँग्रेसला केवळ ३ महापालिकांमध्ये यश मिळाले आहे. यामध्ये लातूर आणि भिवंडी निजामपूरमध्ये त्यांनी स्वबळावर, तर चंद्रपूरमध्ये शिवसेना (उबाठा) च्या साथीने सत्ता स्थापन केली आहे. उद्धव ठाकरे यांच्या गटाला परभणीमध्ये यश मिळाले आहे, तिथे त्यांनी काँग्रेसच्या पाठिंब्याने सत्ता मिळवली आहे.

बहुजन विकास आघाडीने आपलं अस्तित्व टिकवत वसई-विरार महापालिकेवर पुन्हा एकदा पकड मजबूत केली आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पराभवाचा धक्का बसला होता. त्यानंतर ही महापालिका निवडणूक बहुजन विकास आघाडीसाठी महत्त्वाची होती.

मालेगाव महानगरपालिकेचा निकाल मात्र पेचात अडकला आहे. येथे कोणत्याही प्रमुख पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे सत्तेच्या चाव्या आता अपक्षांच्या हाती असून, ते कोणाला पाठिंबा देतात यावर मालेगावचा महापौर ठरणार आहे.

# जळगावात पैकीच्या पैकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जळगाव :** उत्तर महाराष्ट्रातील जळगाव महापालिकेत भाजपने कमाल कामगिरी करत सर्वच ४६ जागांवर विजय मिळवला असून पक्षाचा स्ट्राईक रेट १००% राहिला आहे. 'संकटमोचक' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंत्री गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखाली हा यशाचा झेंडा फडकला आहे.

जळगाव, धुळे आणि नाशिक या महत्त्वाच्या महापालिकांची जबाबदारी गिरीश महाजन यांच्याकडे असताना, या तिन्ही शहरांत भाजपने सत्ता स्थापनेच्या दिशेने भक्कम पावले उचलली आहेत. जळगावमधील या दणदणीत विजयामुळे पक्षाच्या रणनीती आणि नेतृत्वावर विश्वास अधिक दृढ झाला आहे.

धुळे महापालिकेत भाजप ५० पेक्षा अधिक जागांवर आघाडीवर आहे, तर नाशिक महापालिकेतही भाजपने ७० हून अधिक जागांवर जोरदार कामगिरी करून सत्ता स्थापनेसाठी निर्णायक पाऊल टाकले आहे. या निकालामुळे उत्तर महाराष्ट्रात भाजपची पकड अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट दिसते.

याव्यतिरिक्त, जळगाव महापालिकेत भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांचे १२ उमेदवार बिनविरोध विजयी ठरले आहेत. यामध्ये भाजपचे ६ आणि शिंदे गटाचे ६ उमेदवार आहेत. गुरुवारी (१ जानेवारी) भाजपचा एक आणि शिंदे गटाचे तीन उमेदवार बिनविरोध निवडले गेले होते. अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी आणखी उमेदवार बिनविरोध निवडल्याने ही संख्या वाढली.

या यशामुळे जळगावमधील भाजपची सत्ता आणि पक्षाचे नेतृत्व दोन्ही अधिक दृढ झाले असून, मंत्री गिरीश महाजन यांच्या कुशल नियोजनाची आणि संघटनात्मक ताकदीची प्रशंसा सर्वत्र होत आहे.

## भाजपचे 'पुणे मॉडेल' यशस्वी, राष्ट्रवादीचा बालेकिल्ला उद्ध्वस्त

# पुण्यात 'अण्णांनी' केलं 'दादांना' चितपट!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे महापालिकेच्या निवडणुकीत शहराच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडली आहे. नऊ वर्षांनंतर झालेल्या या लढतीत भाजपने जोरदार मुसंडी मारत पुण्यात पुन्हा एकदा आपलं वर्चस्व सिद्ध केलं आहे. प्राथमिक कलांनुसार भाजप जवळपास १०० जागांपर्यंत पोहोचण्याच्या तयारीत असून, राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसल्याचे स्पष्ट दिसत आहे.

अजित पवार विरुद्ध केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ अशी रंगलेली प्रतिष्ठेची लढाई अखेर भाजपच्या पारड्यात गेली आहे. पुण्यातील ही निवडणूक महत्त्वाची होती कारण शहरात मेट्रो, रस्ते, वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचा प्रश्न कायम चर्चेत होता.

भाजपने प्रचारात 'विकासाचा अजेंडा' पुढे ठेवला. मेट्रो विस्तार, भुयारी रस्ते, स्मार्ट ट्रॅफिक व्यवस्थापन आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांवर लक्ष केंद्रीत करून मतदारांशी संपर्क साधला. राष्ट्रवादी काँग्रेसने मोफत पीएमपी बससेवा, मोफत मेट्रो प्रवास आणि घरांना मिळकतकर माफीसारख्या घोषणांवर भर दिला; मात्र पुणेकरांनी 'फुकटची आश्वासने' नाकारून विकासाला पसंती दिली.

भाजपच्या विजयामागे संघटनात्मक ताकद मोठा घटक ठरली. बूथस्तरावर केलेली काटेकोर तयारी, कार्यकर्त्यांची मेहनत आणि आरएसएसचा अप्रत्यक्ष पाठिंबा भाजपसाठी निर्णायक ठरला. अनेक ठिकाणी हिंदुत्ववादी भूमिका प्रभावी ठरली, तर मातब्बर नेत्यांच्या मुलांना तिकिट देऊन तुलनेने कमी खर्चात यश मिळवले.

राष्ट्रवादी काँग्रेससाठी ही निवडणूक धक्कादायक ठरली. काही ठिकाणी वादग्रस्त आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना तिकिट दिल्यामुळे पक्षावर टीकेची झोड उठली. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली जाहीर मुलाखत आणि अजित पवारांवर केलेली आक्रमक टीका भाजपसाठी टर्निंग पॉइंट ठरली.

यंदाच्या महापालिका निवडणुकीत भाजपच्या आघाडीमुळे अजित पवारांचा पुण्यातील बालेकिल्ला उद्ध्वस्त झाला असून, मुरलीधर मोहोळांनी यात मोलाची भूमिका बजावली असल्याने, राज्य राजकारणात हा चर्चेचा विषय ठरला आहे. या निकालामुळे पुण्यातील सत्तासमीकरण पूर्णपणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. भाजप पुन्हा महापौरपदावर दावा ठोकण्याच्या स्थितीत असून, राष्ट्रवादीसाठी ही निवडणूक आत्मपरीक्षणाची वेळ ठरणार आहे. पुणेकरांनी दिलेला हा कौल विकासाच्या राजकारणाला मिळालेली स्पष्ट मान्यता मानली जात आहे. येणाऱ्या काळात भाजपा पुणे जिल्ह्यात आपली पाळेमुळे अधिक बळकट करेल, असे मानले जाते.

## महेश लांडगे आणि शंकर जगताप यांच्यात चुरस

# पीसीएमसी कारभारी चिंचवडचा की भोसरीचा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत महापौरपद कोणाच्या हाती जाणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले असतानाच भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. महापालिकेत भाजपची एकहाती सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर सध्याच्या राजकीय समीकरणांवरून पुढील महापौर भाजपचाच असणार, हे जवळपास निर्विवाद मानले जात आहे. मात्र हा महापौर भोसरी विधानसभा मतदारसंघातून येणार की चिंचवड विधानसभा मतदारसंघातून, याची उत्सुकता आता शहरभर चर्चेचा विषय ठरली आहे.

भाजपचे आमदार शंकर जगताप आणि आमदार महेश लांडगे यांच्या मतदारसंघांनी निवडणुकीत पक्षाला भक्कम बळ दिले आहे. या दोन्ही मतदारसंघांतील संघटनात्मक ताकद, व्यापक जनसमर्थन आणि मिळालेला कौल लक्षात घेता भाजप महापौरपदावर ठाम दावा सांगत आहे. स्थानिक पातळीवर राबवण्यात आलेली विकासकामे, नागरिकांशी असलेला थेट संवाद आणि प्रभावी नेतृत्वामुळे भाजपची पकड शहरात अधिक घट्ट झाल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

दरम्यान, महापौरपदासाठी कुणाच्या मतदारसंघातील उमेदवाराला संधी मिळणार, यावरून आमदार जगताप आणि आमदार लांडगे यांच्या समर्थकांमध्ये रस्सीखेच होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे. 'महापौर भाजपचाच' हा नारा आता केवळ घोषणापुरता मर्यादित न राहता, तो भाजपच्या निवडणूक-उत्तर रणनीतीचा महत्त्वाचा भाग बनला असल्याचे जाणकारांचे मत आहे.विरोधी पक्षांकडून हालचाली सुरू असल्या तरी भाजपचे मजबूत संघटन, अनुभवी नेतृत्व आणि आगामी निवडणुकांसाठी आधीपासून सुरू असलेली तयारी यामुळे भाजपच आघाडीवर असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. महापौरपदाची अधिकृत घोषणा अद्याप बाकी असली, तरी पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात भाजपचा वाढता आत्मविश्वास आणि वर्चस्व दिवसेंदिवस अधिक ठळक होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

## हितेंद्र ठाकूरांचा बालेकिल्ला अभेद्य

**विरार :** वसई-विरार महानगरपालिकेच्या ११५ सदस्यांच्या निवडणुकीत बहुजन विकास आघाडीने आपला बालेकिल्ला शाबूत राखत निर्विवाद बहुमत मिळवले आहे. बीव्हीएने ७० जागा जिंकल्या असून काँग्रेसचा एक उमेदवार या आघाडीत सामील झाल्याने एकूण आकडा ७१ वर पोहोचला आहे. महायुतीला ४४ जागांवर समाधान मानावे लागले. या निकालात सर्वात मोठा धक्का बसला तो माजी महापौर रुपेश जाधव यांना. अटीतटीच्या लढतीत त्यांचा पराभव झाला असून त्यांनी तातडीने फेरमतमोजणीसाठी अर्ज दाखल केला आहे. हितेंद्र ठाकूर यांचे चुलत भाऊ आणि माजी सभापती पंकज ठाकूर यांचा भाजपचे उमेदवार मेहुल शहा यांनी पराभव केला. हा पराभव मोठा ठरला आहे.

# सोलापुरात भाजपचा ऐतिहासिक विजय!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**सोलापूर :** महाराष्ट्र महापालिका निवडणुकीत सोलापूर महापालिकेत भाजपने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. १०२ जागांपैकी भाजपने ५८ जागांवर विजय मिळवला, तर एमआयएमने ४, काँग्रेस आणि शिवसेनेने प्रत्येकी १ जागा जिंकली. महत्त्वाचे म्हणजे काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेला भाजपने पूर्णपणे व्हाईटवॉश केले, फक्त एमआयएमने आपली ताकद टिकवली.

भाजपच्या विजयामागे नव्या दमाच्या आमदार देवेंद्र कोठे यांचे नेतृत्व महत्त्वाचे ठरले. जुन्या आमदार विजयकुमार आणि सुभाष देशमुख नाराज असतानाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी देवेंद्र कोठे यांच्या पाठीशी उभे राहून पक्षाला सोलापुरात अभूतपूर्व यश मिळवून दिले. या निकालामुळे दोन्ही देशमुख आमदारांसह, काँग्रेसचे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि त्यांची कन्या खासदार प्रणिती शिंदे यांना मोठा धक्का बसला आहे.

सन २०१७ साली भाजप केवळ ४८ जागांवर होते; मात्र २०२६ मध्ये 'आपकी बार ७५ पार' असा नारा प्रत्यक्षात उतरला आहे. पक्षाच्या अंतर्गत संघर्ष आणि जुन्या नेत्यांची नाराजी, तसेच प्रचारातील उड्या, राडे, खूनप्रकरणे याबाबतच्या चर्चांनंतरही भाजपने सोलापुरात आपली ताकद सिद्ध केली.

मुस्लिमबहुल भागांमध्ये फक्त एमआयएमला प्रतिसाद मिळाला, तर काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी आणि मनसेला ठणठणीत पराभव पत्करावा लागला. सोलापुरातील विजयामागे नव्या नेतृत्वाची, स्पष्ट रणनीतीची आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रभावाची मोठी भूमिका होती.

सोलापुरात भाजपने फक्त सत्ता मिळवली नाही, तर विरोधकांसह पक्षातील जुने नेतेही अप्रत्यक्षरीत्या पराभूत केले, हे निकाल स्पष्टपणे दर्शवतात.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजकारणातील नवा टप्पा

# नागपूरच्या नगरसेवकापासून मुंबईच्या विजयापर्यंत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** नागपूर महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून राजकारणाची पहिली पायरी टाकणारा हा नेता पुढे महाराष्ट्राच्या सत्ताकारणाचा केंद्रबिंदू ठरेल, याची कल्पना तेव्हा फार थोड्यांनाच होती. मात्र २०१४ आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपच्या विजयात निर्णायक भूमिका बजावल्यानंतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. आता बृहन्मुंबई महानगरपालिका आणि राज्यातील इतर महापालिकांमधील भाजपच्या यशाने त्यांच्या राजकीय कारकिर्दीला आणखी एक उंची मिळाली आहे.

फडणवीसांच्या नेतृत्वाखाली भाजप पुणे, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, जळगाव, कल्याण-डोंबिवलीसारख्या प्रमुख शहरांमध्ये सत्ता मिळवण्याच्या मार्गावर आहे. आशियातील सर्वात श्रीमंत नागरी संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई महापालिकेवर भाजपचा ताबा येण्याची शक्यता निर्माण झाल्याने, फडणवीसांचे राजकीय वजन राज्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. ते भाजपसाठी संभाव्य राष्ट्रीय नेतृत्व म्हणूनही चर्चेत आले आहेत.

भाजपसाठी सर्वात प्रतिष्ठेचा आणि महत्त्वाचा विजय म्हणजे बीएमसी. शिवसेनेने जवळपास ३५ वर्षे मुंबई महापालिकेवर वर्चस्व ठेवले होते. २०१७ पर्यंत भाजप हा केवळ कनिष्ठ भागीदार होता. मात्र २०१७ च्या निवडणुकीत भाजपने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेत २२७ पैकी ८२ जागा जिंकल्या आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षापेक्षा केवळ दोन जागांनी मागे राहिला. त्या वेळी केंद्रात आणि राज्यात दोन्ही ठिकाणी भाजप-शिवसेना सत्तेत होते. याच संधीचा उपयोग करत फडणवीसांनी मुंबईत भाजपची पाळेमुळे अधिक खोलवर रुजवली. त्यांनी पक्षाला केवळ हिंदुत्वाच्या चौकटीत न ठेवता विकासाभिमुख पर्याय म्हणून सादर केले. मुंबईतील मेट्रो सेवा, मुंबई-नवी मुंबई जोडणारा अटल सेतू, कोस्टल रोडसारखे प्रकल्प, बीडीडी चाळींचा पुनर्विकास - या साऱ्यांतून त्यांनी 'विकासाचा चेहरा' अधोरेखित केला.

मतपेढ्यांच्या पातळीवरही फडणवीसांनी काळजीपूर्वक पावले टाकली. गुजराती आणि उत्तर भारतीय मतदारांमध्ये भाजपची पारंपरिक ताकद अधिक मजबूत करतानाच, दक्षिण भारतीय समाजापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न झाला. त्याचवेळी मराठी मतदारांवर असलेली ठाकरे गटाची पकड सैल करण्यासाठी त्यांनी स्वतःला 'मजबूत मराठी माणूस' म्हणून पुढे आणले. पुनर्विकासातून घरे, झोपडपट्टीवासीयांसाठी घरकुल, रोजगार आणि सुरक्षिततेची आश्वासने देत त्यांनी हा संदेश दिला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने ठाकरे गटाच्या शाखा पातळीवरील कार्यकर्ते, नगरसेवक आणि नेत्यांना आपल्या बाजूला वळवले. 'कोणत्याही किंमतीत ठाकरे गटाचा पराभव' हे उद्दिष्ट ठेवून संसाधनांची मुक्तहस्ते मदत करण्यात आली.

मुंबई महापालिकेतील भाजपचा संभाव्य विजय आणि महापौरपदावर भगवा झेंडा फडकण्याची शक्यता फडणवीसांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड मानली जात आहे. कारण मुंबई हा ठाकरे यांचा अभेद्य बालेकिल्ला मानला जात होता. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी कधीकाळी मुंबईत भाजपची सत्ता यावी, अशी इच्छा व्यक्त केली होती. त्यामुळे हा विजय वाजपेयींना दिलेली राजकीय श्रद्धांजली म्हणूनही पाहिला जात आहे. हिंदुत्व आणि विकास यांची सांगड घालणारा नेता म्हणून त्यांची प्रतिमा मजबूत होत आहे.

# अजित पवारांवर पैलवानांचा 'ख्वाडा'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** निवडणुकांची घोषणा झाल्यापासून अजित पवार जिल्ह्यात ठाण मांडून बसले होते. त्यांनी पुण्यासह पिंपरी चिंचवड पालिकेसाठी ताकद पणाला लावली होती. यासाठी त्यांनी शरद पवारांसोबत युती केली होती. या दोन्ही पालिकेत त्यांना धक्का बसला आहे. इथं दोन पैलवानांनी ख्वाडा डाव टाकून महापालिका हिसकावून घेतल्या आहेत.

हे दोन पैलवान म्हणजे महेश लांडगे आणि मुरलीधर मोहोळ. अजित पवारांनी दोन्ही पैलवानांना खुलं आव्हान दिलं होतं. महेश लांडगे नासका आंबा, भारंदाज डाव टाकून फिरवून फेकून दिला नाही तर पवारांची औलाद नाही, असं विधान अजित पवारांनी केलं होतं. शिवाय त्यांनी लांडगे यांच्यावर पालिकेत भ्रष्टाचार केल्याचा देखील आरोप केला होता. मी ठरवलं तर एखाद्याचा कार्यक्रम करतो, असंही अजित पवार म्हणाले होते. यावरून महेश लांडगे यांनी देखील अजित पवारांचा एकेरी उल्लेख करत टीका केली होती. "१९९१ साली तुला कोण ओळखत होतं? चुलते नसते तर तुला कोण ओळखलं असतं? तू कार्यक्रम करतोस म्हणतोस, तर मी काय बांगड्या घातल्या आहेत का? आमच्या लाडक्या रणरागिणी, म्हणजेच लाडक्या बहिणी तुझा कार्यक्रम करतील", असा घणाघात महेश लांडगे यांनी केला होता. हीच बाब मुरलीधर मोहोळांबाबत होती. आता या दोन्ही पैलवानांनी अजित पवारांना ख्वाडा टाकला आहे.

पुण्यात भाजपनं ९० जागा जिंकल्या आहेत. अजित पवार गटाला अवघ्या २० जागा जिंकता आल्या. पिंपरी चिंचवडमध्ये देखील महेश लांडगेंनी विजय खेचून आणला.

## संपादकीय

### सामान्यांना निवडणुका हव्यात का?



**लोकशाहीचा उत्सव म्हणून निवडणुका साजऱ्या होतात. प्रचार, घोषणा आणि वादविवादांचा गोंगाट वाढतो. मात्र या सगळ्यात सामान्य माणसाचं रोजचं जगणं बदलत नाही. मत देणारा नागरिक नेमका कुठे आहे, आणि निवडणुका खरंच त्याच्यासाठीच आहेत का, हा प्रश्न पुन्हा उभा राहतो.**

लोकशाहीत निवडणूक म्हणजे उत्सव, असा समज दशकानुदशके रुजवला गेला आहे. १९५२ पासून आजवर झालेल्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीत हा उत्सव अधिक भव्य आणि अधिक गोंगाटी होत गेला. रस्त्यांवर झेंडे, भिंतींवर घोषणा, चौकाचौकांतील भाषणे आणि टीव्हीवर अखंड चर्चा यांतून लोकशाही सशक्त असल्याचा भास निर्माण केला जातो. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकांत तर हा उत्सव प्रचाराच्या महाकुंभात बदलला. मात्र या सगळ्या गदारोळाच्या मध्यभागी उभा असलेला सामान्य माणूस शांतपणे एकच प्रश्न विचारतो. या सगळ्याचा माझ्याशी नेमका संबंध काय? सामान्य माणसाचा दिवस मतपेटीपासून सुरू होत नाही. तो कामाच्या शोधात, रोजंदारीच्या हजेरीत किंवा शेतातल्या पेरणीने सुरू होतो. वर्षाचा पहिला दिवस असो किंवा पावसाळ्यातला एखादा जून महिना, काम केलं तरच भाकरी मिळते, हीच त्याची खरी लोकशाही आहे. निवडणूक जाहीर झाली की काही आठवड्यांसाठी त्याला मतदार राजा ठरवले जाते. त्याचे कौतुक होते, त्याच्या मताचा थेट देशाच्या भवितव्याशी संबंध जोडला जातो. पण निकाल जाहीर झाल्याच्या दिवशी, २३ मे २०१९सारख्या एखाद्या तारखेला, हा औटघटकेचा राजा पुन्हा सामान्य प्रजा बनतो. राजकीय पक्ष निवडणुकीला विचारधारांची लढाई म्हणतात. १९७७ पासून आजपर्यंत प्रत्येक निवडणुकीत हीच भाषा ऐकू येते. प्रत्यक्षात मात्र ही लढाई सत्तेसाठीची असते. विचारधारा भाषणांपुरत्या मर्यादित राहतात. त्या पोस्टरवरच्या ओळी बनतात. सामान्य माणसाच्या आयुष्यात त्यांचा थेट प्रवेश क्वचितच होतो. महागाई दरवर्षी वाढत जाते. २०२० नंतर तर ती रोजच्या जगण्याचा स्थायी भाग झाली आहे. नोकऱ्या मिळत नाहीत, शिक्षण महाग होतं, आरोग्यव्यवस्था ढासळते. निवडणूक प्रचारात हे प्रश्न जाहीरनाम्यांत नोंदवले जातात, भाषणांत उल्लेखले जातात, पण सत्तास्थापनेनंतर ते हळूहळू मागे पडतात. शपथविधी झाल्यावर, मग तो ३० मे २०१४ असो वा ९ जून २०१९, सोयीस्कर मौन प्रस्थापित होतं. निवडणूक प्रक्रियेत सामान्य माणसाची भूमिका काय, तर पाच वर्षांतून एकदा मतदान यंत्राचं बटण दाबण्याची. एखाद्या एप्रिल किंवा मे महिन्यातल्या एका दिवशी. एवढ्यावरच त्याचं लोकशाहीतील योगदान संपतं. उरलेल्या काळात निर्णय घेतले जातात ते त्याच्याशिवाय. कायदे बनतात, धोरणं ठरतात, कर वाढतात. २०१७ मध्ये जीएसटी लागू होतं, पुढील वर्षांत नियम बदलतात, पण सामान्यांना विचारलं जात नाही. उलट त्याने प्रश्न विचारले, तर त्याला अडथळा मानलं जातं. कधी विकासविरोधी, कधी नकारात्मक, कधी समाजविघातक ठरवलं जातं. लोकशाहीत प्रश्न विचारणं हा हक्क असायला हवा, पण इथे तो अनेकदा अपराध मानला जातो. निवडणुकांचं राजकारण सामान्य माणसाला नागरिक म्हणून जोडण्याऐवजी त्याला गटात विभागतं. जात, धर्म, भाषा आणि प्रांत या ओळखी हेतूपुरस्सर पुढे आणल्या जातात. माणूस म्हणून असलेली त्याची ओळख मागे पडते. राजकीय संघर्ष तीव्र झाला की त्याची किंमत सामान्यजनच चुकवतो. १९८४ असो, १९९२ असो किंवा त्यानंतरची अनेक वर्षे, दंगली, तणाव आणि असुरक्षिततेचा भार सामान्य माणसाच्या खांद्यावरच येतो. सत्तेच्या खेळात त्याचं मरण ओढवतं. फायदा मात्र सत्ताधाऱ्यांच्या वाट्याला जातो. मग प्रश्न उरतो की सामान्य माणसाला निवडणुका हव्यात का. उत्तर सरळ आहे. हव्यात. पण आजच्या स्वरूपात नव्हे. निवडणूक नसलेली व्यवस्था अधिकच धोकादायक आहे. ती सामान्य माणसाला पूर्णतः अदृश्य करते. किमान निवडणुकीत, मतदानाच्या त्या एका दिवशी, तो दिसतो आणि ऐकला जातो. ते काही दिवसांसाठी का असेना. खरी अडचण निवडणुकांची नाही, तर निवडणुकीपुरती मर्यादित असलेल्या लोकशाहीची आहे. सामान्य माणसाला अशी लोकशाही हवी आहे जी मतदानापुरती संपणारी नसेल. मतदानानंतरही, निकाल जाहीर झाल्यानंतरही, जिथे त्याचा आवाज ऐकला जाईल, प्रश्नांना उत्तरं मिळतील आणि सत्ताधाऱ्यांना जाब विचारता येईल. हाताला काम, पोटाला भाकरी आणि जगताना किमान सन्मान या मूलभूत गरजा केंद्रस्थानी असतील, अशा निवडणुका त्याला हव्यात. लोकशाहीच्या उत्सवात सहभागी करून घेत, निकालानंतर सामान्यांनाच विसरणारी लोकशाही नको. रोजच्या जगण्यात साथ देणारी लोकशाही त्याला हवी आहे. अन्यथा निवडणुका होत राहतील. २०२९ येईल, २०३४ येईल. सत्ता बदलत राहील. आणि सामान्य माणूस मात्र एका प्रश्नासोबत ठाम उभा राहील. निवडणुका खरंच आपल्यासाठी आहेत का?

# राज्यात शहरी मतदार भाजपकडेच!

**विधानसभा निवडणुकांच्या निकालांनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा बदल घडताना दिसत आहे. विशेषतः शहरी भागात भारतीय जनता पार्टीने (भाजप) आपले वर्चस्व अधिक ठळकपणे सिद्ध केले असून, विरोधी पक्षांची ताकद दिवसेंदिवस क्षीण होत चालल्याचे चित्र आहे.**




विधानसभा निवडणुकांच्या निकालांनंतर विरोधी पक्षांची भूमिका कमकुवत होत चालली असून, नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकांनी हे चित्र आणखी स्पष्ट केले आहे. लातूर, कोल्हापूर, परभणी, चंद्रपूर यांसारखी काही अपवादात्मक शहरे वगळता राज्यातील बहुतांश शहरी महापालिकांमध्ये भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे.

राज्यातील सर्व २९ महापालिकांचे निकाल पाहता, शहरी मतदारांचा कल भाजपकडे झुकलेला दिसतो. पायाभूत सुविधा, स्मार्ट सिटी योजना, रस्ते, उड्डाणपूल, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, डिजिटल सेवा आणि केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी या मुद्द्यांवर भाजपने शहरी मतदारांचा विश्वास संपादन केल्याचे जाणवते. विकासाचे ठोस काम आणि निर्णयक्षम नेतृत्व ही बाब शहरी मतदारांसाठी महत्त्वाची ठरत असून, त्याचा थेट फायदा भाजपला मिळत आहे.

या सगळ्या राजकीय घडामोडींमध्ये मुंबई महापालिकेवर भाजपची सत्ता येणे हा सर्वात निर्णायक टप्पा मानला जात आहे. राज्याची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई जिंकणे म्हणजे केवळ एक स्थानिक स्वराज्य संस्था जिंकणे नाही, तर संपूर्ण राज्याच्या राजकारणाला दिशा देणारी घटना आहे. मुंबईतील सत्ता भाजपच्या आत्मविश्वासात भर घालणारी ठरली असून, २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत स्वबळावर उतरायची रणनीती भाजप आखत असल्याचे संकेत मिळत आहेत. दुसरीकडे, विरोधी पक्षांची अवस्था मात्र चिंताजनक आहे. विधानसभा निवडणुकांनंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांच्यात नेतृत्वाचा गोंधळ, गटबाजी आणि एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरूच आहेत. शहरी मतदारांशी थेट संवाद साधणारा ठोस अजेंडा विरोधकांकडे नसल्याचे महापालिका निकालांतून दिसून आले आहे. स्थानिक प्रश्न उपस्थित केले जात असले तरी त्यांना व्यापक राजकीय दिशा देण्यात विरोधी पक्ष अपयशी ठरत आहेत.

भाजपच्या यशामागे संघटनात्मक ताकद हा महत्त्वाचा घटक आहे. बूथस्तरावर कार्यरत असलेली यंत्रणा, सातत्यपूर्ण जनसंपर्क, कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे आणि केंद्र व राज्य सरकारमधील समन्वय यामुळे भाजपला शहरी भागात खोलवर पोहोचता आले आहे. "डबल इंजिन सरकार" ही संकल्पना प्रत्यक्ष विकासकामांतून मतदारांसमोर मांडण्यात भाजप यशस्वी ठरला आहे. त्यामुळे स्थैर्य, वेगवान निर्णय आणि विकास यासाठी शहरी मतदार भाजपकडे झुकताना दिसत आहेत.

महापालिका निवडणुकांचे निकाल हे अनेकदा आगामी विधानसभा निवडणुकांचे संकेत मानले जातात. त्या दृष्टीने पाहता, २०२९ च्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने आतापासूनच रणनीती आखण्यास सुरुवात केली असल्याचे स्पष्ट होते. "शतप्रतिशत" म्हणजेच बहुमताहून अधिक जागा मिळवण्याचा आत्मविश्वास भाजपमध्ये वाढत असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. मात्र, हा आत्मविश्वास टिकवण्यासाठी भाजपला विकासाचा वेग कायम ठेवणे, महागाई, रोजगार, नागरी समस्या आणि मध्यमवर्गीयांच्या अपेक्षा यावर सातत्याने लक्ष द्यावे लागणार आहे. शहरी मतदारांचा कौल भाजपच्या बाजूने असला तरी ग्रामीण भागातील समीकरणे वेगळी असू शकतात. त्यामुळे आगामी काळात भाजपला शहरी यशाचा धागा ग्रामीण भागाशी जोडण्याचे आव्हान असेल. त्याचवेळी, विरोधी पक्षांनीही आत्मपरीक्षण करून नव्या नेतृत्वासह ठोस कार्यक्रम मांडल्यास राजकीय चित्र बदलू शकते.

एकूणच, सध्याचे वातावरण पाहता महाराष्ट्रातील शहरी मतदार मोठ्या प्रमाणात भाजपकडे एकवटलेले दिसतात. हीच धार २०२९ पर्यंत टिकते की नाही, यावर राज्याचे भविष्यातील राजकारण अवलंबून असणार आहे.

## पुण्यातील सर्वात तरुण नगरसेवक; भाजपच्या सई थोपटेंनी विजयाचा गुलाल उधळला

### प्रभाग क्रमांक ३६ (क) मधून २४०० मतांनी दणदणीत विजय; विद्यार्थी ते नगरसेवक असा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या सई थोपटे यांनी इतिहास रचत पुण्यातील सर्वात तरुण नगरसेवक होण्याचा मान पटकावला आहे. प्रभाग क्रमांक ३६ (क) मधून निवडणूक लढवत सई थोपटे यांनी २४०० मतांनी विजय मिळवला. त्यांच्या या यशामुळे तरुणाईमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, विद्यार्थी अवस्थेतून थेट लोकप्रतिनिधी होण्याचा हा क्षण पुण्याच्या राजकारणात विशेष ठरला आहे.

सई थोपटे सध्या पुण्यातील नामांकित सिम्बायोसिस महाविद्यालयात बीबीएच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहेत. कॉलेजचे वर्ग सुरू असतानाच पक्षाने त्यांना उमेदवारी जाहीर केली होती. अभ्यास, प्रचार आणि जनसंपर्क यांचा समतोल साधत त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि सकारात्मक प्रचार केला. तरुण, महिला आणि मध्यमवर्गीय मतदारांनी त्यांना मोठा प्रतिसाद दिला.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून सई थोपटे यांनी विद्यार्थी जीवनातच सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेतली होती. विविध उपक्रम, आंदोलन आणि जनजागृती कार्यक्रमांतून त्यांनी तरुणांच्या प्रश्नांना वाचा फोडली. कॉलेज परिसरातही विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी ठाम भूमिका मांडणारी नेतृत्वशैली त्यांची ओळख ठरली.

राजकारणात नवख्या असल्या तरी सई थोपटे यांना घरातूनच राजकीय संस्कार लाभले आहेत. त्यांचे वडील प्रशांत थोपटे हे गेल्या अनेक वर्षांपासून भाजपचे सक्रिय पदाधिकारी आहेत. पर्वती विधानसभा मतदारसंघात उपाध्यक्ष, सरचिटणीस, विधानसभा निवडणूक संयोजक अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. पर्वती, सहकारनगर, धनकवडी परिसरात भाजप संघटन मजबूत करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. आमदार माधुरी मिसाळ यांनी थोपटे कुटुंबीयांची पक्षाशी असलेली एकनिष्ठा आणि सई थोपटे यांची कार्यक्षमता लक्षात घेऊन उमेदवारी दिल्याचे बोलले जात आहे. या प्रभागात भाजपने एकतर्फी वर्चस्व राखले असून सहकारनगर-पद्मावती प्रभाग क्रमांक ३६ मधील भाजपचे चारही उमेदवार विजयी झाले आहेत. महेश वाबळे यांनी ५००० मतांनी, भोसले शैला यांनी २५९५ मतांनी, सई थोपटे यांनी २४०० मतांनी तर विना घोष यांनी ४००० मतांनी विजय मिळवला. या निवडणुकीत आबा बागुल, अश्विनी कदम आणि सुभाष जगताप यांचा मोठा पराभव झाला. सई थोपटे यांच्या विजयामुळे पुणे महानगरपालिकेला सर्वात तरुण नगरसेवक मिळाला असून, तरुणांना राजकारणात सक्रिय होण्यासाठी हा विजय निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

## मतदानावेळी ईव्हीएमचा फोटो काढला; माजी महापौरांच्या पतीवर गुन्हा दाखल




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज शहरात शांततेत मतदान सुरू असताना एक गंभीर प्रकार समोर आला आहे. मतदान करताना ईव्हीएम मशीनचा फोटो काढून तो सोशल मीडियावर पोस्ट केल्याप्रकरणी माजी महापौरांच्या पतीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवडच्या माजी महापौर अपर्णा डोके यांचे पती निलेश डोके यांनी मतदान करताना थेट ईव्हीएमवरील चिन्हासमोरील बटन दाबतानाचा फोटो काढला. एवढ्यावरच न थांबता त्यांनी हा फोटो सोशल मीडियावर शेअर करत "अपर्णा डोके यांना बहुमताने विजयी करा" असा मजकूरही पोस्ट केला. ही पोस्ट काही वेळातच व्हायरल झाल्याने निवडणूक आचारसंहितेचा भंग झाल्याचा प्रकार उघडकीस आला.

**पिंपरी-चिंचवडमध्ये मतदान नियमांचे उल्लंघन, सोशल मीडियावर फोटो पोस्ट केल्याने कारवाई**

निवडणूक काळात मतदान गोपनीय ठेवणे बंधनकारक असून, ईव्हीएमचा फोटो काढणे व प्रचारासारखा मजकूर प्रसारित करणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. या प्रकाराची दखल घेत महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या आदेशानुसार संबंधित पोलिस ठाण्यात निलेश डोके यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेत नियम पाळण्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, अतिउत्साहात नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागते, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. या प्रकरणातील घडामोडींकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## केमिकलने मतदानाची शाई पुसण्याचा प्रकार उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राज्यातील २९ महापालिकांसाठी आज सुरू असलेल्या मतदानादरम्यान धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मतदारांच्या बोटांवर लावली जाणारी अमिट शाई केमिकलच्या साहाय्याने सहज पुसली जात असल्याचे निदर्शनास आल्याने दुबार मतदानाचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. या प्रकरणी पोलीस व निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्याची तयारी सुरू आहे.

पुण्यातील धायरी परिसरात मतदान केंद्राबाहेर शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी एका तरुणाला रंगेहात पकडले. संबंधित तरुण केमिकलची बाटली घेऊन मतदारांच्या बोटांवरील शाई पुसत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. एका महिलेच्या बोटावरील शाई पुसताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या पदाधिकाऱ्यांनी त्याला पकडले. यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी त्याला चांगलाच चोप दिल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

## ऑनलाइन कॅब बुक करून चालकाची हत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** ऑनलाइन कॅब बुक करून चालकाला ताम्हिणी घाटात नेऊन माणगाव (जि. रायगड) हद्दीत निर्घृण खून केल्याच्या प्रकरणातील मुख्य आरोपी पोलिसांच्या ताब्यातूनच पसार झाल्याने खळबळ उडाली आहे. बुधवारी (दि. १४ जानेवारी) सायंकाळी सिंहगड रस्ता परिसरातील हिंगणे खुर्द येथे ही धक्कादायक घटना घडली. घराचा पंचनामा सुरू असताना आरोपीने पोलिस अंमलदाराला झटका देत पळ काढला. या प्रकरणी सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला असून, पसार आरोपीचा कसून शोध सुरू आहे.

**आरोपी पोलिसांच्या ताब्यातून पसार**

अनिकेत महेश वाघमारे (वय २६, रा. लक्ष्मीविहार अपार्टमेंट, रोकडोबा मंदिराजवळ, हिंगणे खुर्द, सिंहगड रस्ता) असे पसार झालेल्या आरोपीचे नाव आहे. माणगाव पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या खुनाच्या गुन्ह्यात तो आरोपी असून, पोलिसांच्या ताब्यातून पळून गेल्याप्रकरणी त्याच्यावर नव्याने गुन्हा नोंदवण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यातील माणगाव पोलिस ठाण्यातील पोलिस शिपाई श्रीकांत किरवले (वय २९) यांनी सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार दिली आहे. या खून प्रकरणात अनिकेत वाघमारे व तुषार ऊर्फ सोन्या शरद पाटोळे (वय २४, रा. कर्वेनगर) या दोघांना बाणेर पोलिसांनी कात्रज-देहूरोड बायपास रस्त्यावर चोरीची कार विक्री करताना अटक केली होती. तपासादरम्यान त्यांनी ताम्हिणी मार्गे माणगावच्या हद्दीत कॅबचालकाचा खून केल्याची कबुली दिल्यानंतर बाणेर पोलिसांनी माणगाव पोलिसांना माहिती देत आरोपी त्यांच्या ताब्यात दिले होते. खुनाच्या तपासासाठी माणगाव पोलिसांचे पथक बुधवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास वाघमारे याला घेऊन हिंगणे खुर्द येथील त्याच्या घरी आले. पंचनामा सुरू असतानाच वाघमारेने पोलिस शिपाई किरवले यांना जोरदार धक्का देत तेथून पलायन केले. घटनेची माहिती तात्काळ सिंहगड रस्ता पोलिसांना देण्यात आली. दरम्यान, या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उल्हास कदम करीत आहेत.

## मशीन बदलल्याचा आरोप; रुपाली पाटील ठोंबरे आक्रमक, मतमोजणी तासभर ठप्प

### न्यू इंग्लिश स्कूल केंद्रावरील प्रकारामुळे राजकीय वातावरण तापले; प्रभाग २६ मधील लढतीकडे सर्वांचे लक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पुणे महापालिका निवडणुकीच्या मतमोजणीदरम्यान रंगतदार लढतींना नाट्यपूर्ण वळण मिळाले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार रुपाली पाटील ठोंबरे यांनी मशीन बदलल्याचा आरोप करत आक्रमक भूमिका घेतली. त्यांच्या आक्षेपानंतर पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल येथील मतमोजणी केंद्रावरील प्रक्रिया थांबवण्यात आली. जवळपास एक तासाहून अधिक काळ मतमोजणी बंद राहिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली.

प्रभाग क्रमांक २६ सह दोन जागांवर निवडणूक लढवणाऱ्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी मतमोजणी प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केला. निवडणूक अधिकाऱ्यांसमोर तीव्र आक्षेप नोंदवत त्यांनी तपासणीची मागणी केली. यामुळे केंद्रावर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अधिकाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणत तपासणी प्रक्रिया सुरू केल्यानंतर मतमोजणी पुन्हा सुरू करण्यात आली.

रुपाली पाटील या पुणे महापालिकेच्या माजी नगरसेविका असून त्यांनी राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून राजकीय कारकीर्दीची सुरुवात केली. २०२१ मध्ये त्यांनी मनसेला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पक्षात फूट पडल्यानंतर त्यांनी अजित पवार यांची साथ दिली होती. उमेदवारी अर्जाच्या शेवटच्या दिवशी त्यांना राष्ट्रवादीकडून एबी फॉर्म मिळाला होता.

दरम्यान, पक्षातील अंतर्गत राजकारणामुळे रुपाली पाटील चर्चेत राहिल्या आहेत. रुपाली चाकणकर यांच्याशी असलेला वाद, तसेच प्रवक्ते आणि स्टार प्रचारकांच्या यादीतून वगळण्यात आल्यामुळे त्यांच्या पक्षातील भवितव्याबाबत चर्चा रंगल्या होत्या. असे असतानाही मतमोजणीदरम्यान घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे रुपाली पाटील ठोंबरे पुन्हा एकदा केंद्रस्थानी आल्या असून, प्रभाग २६ मधील निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**रुपाली विरुद्ध रुपाली संघर्ष**

● रुपाली चाकणकर आणि रुपाली पाटील यांच्यामधील अंतर्गत वाद काही दिवसांपासून उफाळून आलेला दिसला. पक्षातील अंतर्गत वादामुळे अस्वस्थ असलेल्या रुपाली पाटील राष्ट्रवादीला रामराम ठोकणं निश्चित मानलं जात असतानाच रुपाली पाटील यांनी शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेतल्याने त्या 'घड्याळ' सोडून शिवसेनेत प्रवेश करण्याच्या चर्चा रंगल्या होत्या.

**प्रवक्ते आणि स्टार प्रचारकांच्या यादीतून वगळलं**

● याआधी, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी राष्ट्रवादीच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली होती. त्यात रुपाली पाटलांना स्थान मिळालं नव्हतं. त्यापूर्वी प्रवक्त्यांच्या यादीत त्यांना जागा मिळाली नव्हती. त्यामुळे रुपाली पाटलांची पक्षातून गच्छंती निश्चित मानली जात असताना त्यांना तिकीट मिळाले.

## बारावीच्या विद्यार्थिनीवर अत्याचाराचा प्रयत्न; विरोध केल्याने मारहाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** लोणी काळभोर, ता. १६ : घरी कोणीही नसल्याची संधी साधून बारावीच्या विद्यार्थिनीच्या घरात जबरदस्तीने घुसून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (ता. १४) दुपारी सुमारे बारा वाजण्याच्या सुमारास लोणी काळभोर परिसरात घडली. पीडितेने विरोध केल्याने आरोपीने तिला मारहाण केल्याचा प्रकार समोर आला असून, या प्रकरणी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समीर अकबर हाश्मी (रा. कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी १९ वर्षीय पीडित विद्यार्थिनीने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिता ही लोणी काळभोर परिसरातील एका नामांकित शाळेत इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत आहे. सन २०२१ पासून आरोपी तिला सातत्याने धमकावत होता. तिने प्रस्तावाला नकार दिल्यास जीवे मारण्याची, शिक्षणात अडथळे आणण्याची तसेच कुटुंबीयांना इजा करण्याची धमकी देत मानसिक छळ केला जात होता.

बुधवारी दुपारी पीडिता घरी एकटी असताना आरोपीने घरात जबरदस्तीने प्रवेश केला आणि तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. पीडितेने प्रतिकार करत मदतीसाठी ओरडण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने तिच्यावर मारहाण करून जखमी केले.

या घटनेनंतर पीडितेने धैर्याने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तिच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम ७४, ७५, ७८, ३५१, ३३१, ११५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### उसाला १०० रुपये प्रतिटन अनुदान

**भवानीनगर :** श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने १६ जानेवारीपासून गाळपास येणाऱ्या सर्व प्रकारच्या उसाला प्रतिटन १०० रुपये अनुदान जाहीर केले आहे, अशी माहिती अध्यक्ष पृथ्वीराज जाचक व उपाध्यक्ष कैलास गावडे यांनी दिली. आडसाली उसाचे प्रमाण जास्त असल्याने ऊसतोडीला होणारा विलंब व शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आडसाली, सुरू, पूर्व हंगामी व खोडवा उसाला प्रतिटन ३,२०१ रुपये दर मिळणार आहे.

### वाहनाच्या धडकेत तरसाचा मृत्यू



**मंचर :** पुणे–नाशिक महामार्गावरील एकलहरे गावच्या हद्दीत अज्ञात वाहनाच्या धडकेत सुमारे पाच वर्षांचा पूर्ण वाढ झालेला तरस गंभीर जखमी होऊन मृत झाला. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले, वनरक्षक व बिबट शीघ्र कृती दलाने घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला. कळंब येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. नाचिकेत कठाळे यांनी शवविच्छेदन करून नर्सरीत अंत्यसंस्कार केले. या मार्गावर वन्यजीवांसाठी नैसर्गिक कॉरिडॉर नसल्याने अपघात वाढत असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

### श्री केशवराज शिक्षण संस्थेच्या स्नेहसंमेलनाची सांगता

**आळंदी :** मरकळ (ता. खेड) येथील श्री केशवराज शिक्षण संस्थेच्या नवीन माध्यमिक, उच्च माध्यमिक व पवनसुत इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. माजी अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर यांनी पालकांच्या स्मरणार्थ संस्थेस १ लाख ५१ हजारांची देणगी दिली. यावेळी लोकनृत्य स्पर्धा, विज्ञान व रांगोळी प्रदर्शन झाले.

## कवठे येमाई–टाकळी हाजी गटात राजकीय चुरस टोकाला

# शिरूरच्या ‘बेट’ भागात जिल्हा परिषदेसाठी पंचरंगी लढतीचे संकेत!

■ दैनिक राज्य लोकतंत्र







**जांबुत :** महानगरपालिका निवडणुकांची धामधूम ओसरताच आता पुणे जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. या पार्श्वभूमीवर शिरूर तालुक्यातील कवठे येमाई–टाकळी हाजी हा जिल्हा परिषद गट संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेत आहे. ‘बेट’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भागात पंचरंगी, अटीतटीची लढत होण्याचे स्पष्ट संकेत मिळत असून, राजकीय वातावरण तापले आहे. विविध पक्षांचे इच्छुक उमेदवार मैदानात उतरले असून, प्रचारालाही वेग आला आहे.

या निवडणुकीत मातब्बर नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून माजी आमदार पोपटराव गावडे यांचे सुपुत्र राजेंद्र गावडे यांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. गेल्या साठ वर्षांचा राजकीय वारसा, तसेच मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून झालेली विकासकामे हा आपला मोठा भांडवल असल्याचा दावा ते करत आहेत. विकासनिधी, रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांचा मुद्दा पुढे करत त्यांनी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडून दामू घोडे यांनीही निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. त्यांनी वैयक्तिक जनसंपर्क, सामाजिक कार्य आणि सर्वसामान्य मतदारांशी असलेली जवळीक यावर भर दिला आहे. “नेते बदलले, गट बदलले; पण माणूसकी आणि कामाची नाळ जनतेशी तुटू दिली नाही,” असा संदेश देत घोडे मतदारांना साद घालत आहेत.

भारतीय जनता पार्टीकडून ज्येष्ठ नेत्या सावित्रा थोरात या रिंगणात उतरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यांच्या प्रवेशामुळे भाजपची ताकद कोणाच्या पारड्यात जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपने स्वतंत्र ताकदीने लढत दिल्यास गणिते पूर्णपणे बदलू शकतात, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

दरम्यान, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचे समर्थक आणि माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे यांची भूमिका अद्याप गुलदस्त्यात आहे. पोकळे यांनी कोणाला पाठिंबा द्यायचा किंवा स्वतः मैदानात उतरायचे, याचा निर्णय झाला तर या गटातील राजकारणाला कलाटणी मिळू शकते. त्यांच्या निर्णयाकडे सर्व पक्षांचे लक्ष लागले आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटात उद्योजक बाळासाहेब डांगे यांच्या प्रवेशाने नवचैतन्य निर्माण झाले आहे. “३५ वर्षे पक्षाशी निष्ठा ठेवूनही संधी मिळाली नाही. त्यामुळे आता जनतेच्या आग्रहास्तव घराणेशाहीविरुद्ध निवडणूक लढवत आहे,” असा ठाम पवित्रा डांगे यांनी घेतला आहे. त्यांच्या पाठीशी युवकांची मोठी फळी उभी राहत असल्याने ‘मशाल’ पेटणार का, अशी चर्चा सुरू आहे. या पंचरंगी लढतीत विकासकामांचा दावा विरुद्ध वैयक्तिक संपर्क आणि सामाजिक कार्य असा संघर्ष पाहायला मिळत आहे. कोट्यवधींच्या निधीचा मुद्दा, बैलगाडा शर्यती, क्रीडा स्पर्धा, तसेच थेट मदतीमुळे मतदार आपल्यालाच कौल देतील, असा विश्वास सर्वच उमेदवार व्यक्त करत आहेत.

एकूणच, प्रस्थापित नेतृत्व आणि नव्या चेहऱ्यांमधील ही लढत शिरूरच्या ‘बेट’ भागात रंगतदार ठरणार आहे. अखेर विजयाचा गुलाल कोण उधळणार, याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

### विकासाचा मुद्दा की वैयक्तिक संपर्क?

● राजेंद्र गावडे यांनी कोट्यवधींच्या निधीचा दावा केला असतानाच, डॉ. सुभाष पोकळे आणि दामू घोडे यांनी सर्वसामान्यांशी असलेली नाळ आणि सामाजिक कार्याचा आधार घेतला आहे. बैलगाडा शर्यती, क्रीडा स्पर्धा आणि वैयक्तिक मदतीमुळे मतदार आपल्यालाच कौल देतील, असा विश्वास या नेत्यांना वाटतोय. एकूणच, प्रस्थापित नेतृत्व विरुद्ध नवीन चेहरा असा संघर्ष या पंचरंगी लढतीत पाहायला मिळणार असून, शिरूरच्या ‘बेट’ भागाचा ‘विजयाचा गुलाल’ कोण उधळणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# माघी गणेश जयंतीनिमित्त लेण्याद्रीत अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**जुन्नर :** अष्टविनायकापैकी एक असलेल्या श्री क्षेत्र लेण्याद्री येथे माघी गणेश जयंती उत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, या सप्ताहात आठ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. भाविकांसाठी अध्यात्मिक पर्वणी ठरणाऱ्या या सप्ताहाला शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता विणा पूजनाने विधिवत प्रारंभ झाला.

हरिनाम सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा, सायंकाळी हरिपाठ, रात्री हरिकिर्तन आणि त्यानंतर हरिजागर असे भक्तिमय कार्यक्रम होणार आहेत. या सप्ताहात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तनसेवा लाभणार असून, ह.भ.प. प्रियंकाताई साखरे, ह.भ.प. पोपट महाराज राक्षे, ह.भ.प. नेहाताई अर्जुन महाराज साळेकर (भोसले), ह.भ.प. प्रभाकर महाराज कावले, ह.भ.प. भरत महाराज थोरात, ह.भ.प. कृष्णा महाराज कमानकर, तसेच ह.भ.प. दिनानाथ महाराज सावंत यांची कीर्तनसेवा संपन्न होणार आहे. विशेष कार्यक्रम म्हणून गुरुवार दि. २२ जानेवारी रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री गणेश मंदिरात ह.भ.प. नामदेव महाराज वाळके यांचे श्री गणेश जन्मकिर्तन होणार आहे. तसेच शुक्रवार दि. २३ जानेवारी रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. सप्ताह काळात गोळेगाव, माळवाडी नेतवड, कुमशेत, शिवेचीवाडी, गोद्रे, उदापूर आणि गणेशवाडी येथील भजनी मंडळांच्या वतीने हरिजागराचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार असून, माघी गणेश जयंतीनिमित्त लेण्याद्रीत भक्तांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ जास्तीत जास्त भाविकांनी घेऊन ज्ञानामृताचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन श्री क्षेत्र लेण्याद्री देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. अशी माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय ढेकणे व सचिव शंकर ताम्हाणे यांनी दिली.

✚ अष्टविनायक श्री क्षेत्र लेण्याद्री येथे आठ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम; नामवंत कीर्तनकारांची उपस्थिती

# शिक्रापूरच्या उपसरपंचपदी त्रिनयन कळमकर

## चार मतांच्या फरकाने विजय; पाच वर्षांत प्रथमच इतक्या कमी फरकाने उपसरपंच निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिक्रापूर :** ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदासाठी झालेल्या निवडणुकीत त्रिनयन बापूसाहेब कळमकर यांनी चार मतांच्या फरकाने विजय मिळवत उपसरपंचपद पटकावले. पाच वर्षांच्या कालावधीत प्रथमच उपसरपंचपदाची निवडणूक इतक्या कमी मताधिक्याने झाल्याने या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

विद्यमान उपसरपंच वंदना भुजबळ यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपंचपद रिक्त झाले होते. त्यानंतर सरपंच रमेश गडदे यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रामविकास अधिकारी शिवाजी शिंदे यांच्या देखरेखीखाली उपसरपंचपदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी ग्रामपंचायत सदस्यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

उपसरपंचपदासाठी त्रिनयन कळमकर आणि प्रकाश वाबळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. निवडणूक प्रक्रियेत मतदान घेण्यात आले असता त्रिनयन कळमकर यांना दहा मते, तर प्रकाश वाबळे यांना सहा मते मिळाली. त्यामुळे चार मतांच्या फरकाने त्रिनयन कळमकर यांची उपसरपंचपदी निवड झाल्याची अधिकृत घोषणा ग्रामविकास अधिकारी शिवाजी शिंदे व सरपंच रमेश गडदे यांनी केली.

निवडीनंतर ग्रामस्थांच्या वतीने सरपंच रमेश गडदे यांच्या हस्ते नवनिर्वाचित उपसरपंच त्रिनयन कळमकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडीनंतर बोलताना उपसरपंच त्रिनयन कळमकर यांनी गावातील मूलभूत समस्या सोडवण्यासाठी प्राधान्याने काम करणार असल्याचे सांगितले. तसेच महिलांसाठी आणि युवकांसाठी विविध विकासात्मक व सामाजिक उपक्रम राबवण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

### प्रथमच पोलीस बंदोबस्तात निवडणूक

● शिक्रापूर ग्रामपंचायतीत सरपंचपद एका गटाकडे तर उपसरपंचपद दुसऱ्या गटाकडे असताना, सरपंच गटातील त्रिनयन कळमकर आणि प्रकाश वाबळे यांनी उपसरपंच गटाशी हातमिळवणी करत मावळत्या उपसरपंचांचा राजीनामा घेऊन निवडणूक लावली. या निवडणुकीदरम्यान प्रथमच पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता. मतदानात त्रिनयन कळमकर यांना दहा, तर प्रकाश वाबळे यांना सहा मते मिळाल्याने चार मतांनी कळमकर यांनी बाजी मारली. त्यामुळे पाच वर्षांत प्रथमच चार मतांच्या फरकाने उपसरपंच निवड झाल्याची नोंद झाली आहे.

# मरकळ येथे श्री केशवराज महाराज करंडक लोकनृत्य स्पर्धा उत्साहात संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**आळंदी :** मरकळ येथील श्री केशवराज शिक्षण संस्थेच्या पवन्सूत इंग्लिश मीडियम स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित *‘श्री केशवराज महाराज करंडक लोकनृत्य स्पर्धे’*चे पहिले वर्ष मोठ्या उत्साहात पार पडले. आधुनिक काळात आपली पारंपरिक लोकनृत्यकला जपली जावी व ती नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, या उदात्त हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

शाळेचे प्राचार्य मिलिंद नखाते व त्यांच्या सहकाऱ्यांच्या संकल्पनेतून व नियोजनातून या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. पवन्सूत इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्रशस्त प्रांगणात पार पडलेल्या या स्पर्धेत एकूण १२ शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धा लहान व मोठा अशा दोन गटांत पार पडली आणि प्रत्येक गटात विद्यार्थ्यांनी लोकनृत्याच्या सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली. मोठ्या गटात (इयत्ता ८ वी ते १० वी) ॲपेक्स इंटरनॅशनल स्कूल, चऱ्होली यांनी प्रथम क्रमांक पटकावला. नवीन माध्यमिक विद्यालय, मरकळ यांनी द्वितीय, तर पवन्सूत इंग्लिश मीडियम स्कूल, मरकळ यांनी तृतीय क्रमांक मिळवला. लहान गटात (इयत्ता ५ वी ते ७ वी) किड्स पॅराडाईज स्कूल, आळंदी यांनी प्रथम क्रमांक, लर्निंग ट्री स्कूल, वराळे यांनी द्वितीय, तर पवन्सूत इंग्लिश मीडियम स्कूल, मरकळ यांनी तृतीय क्रमांक पटकावला. बक्षीस वितरण समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. या प्रसंगी श्री केशवराज शिक्षण संस्थेचे सचिव राहुल जनार्धन शिंदे, डायरेक्टर प्रवीण चौधरी, संचालक तुकाराम वहिले, किरण लोखंडे, उपसरपंच बाळासाहेब लोखंडे, संचालक शंकरभाऊ लोखंडे, एकनाथ वरपे, नवीन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या छाया लाटे, पर्यवेक्षक शंकर जाचक, तसेच सर्व विभाग प्रमुख व शिक्षक उपस्थित होते. मान्यवरांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मढ येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

# श्री धर्मनाथ महाराज यात्रेनिमित्त भव्य धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

✚ बैलगाड्यांच्या जंगी शर्यती, दीपोत्सव, मिरवणूक व लोकनाट्य तमाशाचे आयोजन

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील रानमळा (लोणी) येथे श्री धर्मनाथ महाराज यात्रा (बिज) निमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि. २० जानेवारी रोजी सकाळी ७ ते ८ या वेळेत देवास हारतुरे व महापूजा होणार असून, सकाळी ८ ते सायंकाळी ७ या वेळेत बैलगाड्यांच्या भव्य जंगी शर्यती रंगणार आहेत.

सायंकाळी ७ ते ९ या वेळेत देवास नैवेद्य, दीपोत्सव, भव्य मिरवणूक व आकर्षक शोभेचे दारुकाम होणार असून, रात्री ९ वाजता मंगला बनसोडे व नितीन बनसोडे यांच्या लोकनाट्य तमाशाचा मनोरंजनात्मक कार्यक्रम होईल. त्यानंतर रात्री ११ ते पहाटे ५ या वेळेत चक्रीय भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

बैलगाड्यांच्या शर्यतींसाठी एकूण १ लाख ७७ हजार ११ रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली असून, त्यात ईडी टीव्ही, फवारणी पंप, टेबल फॅन, मोबाईल तसेच रोख रकमेचा समावेश आहे. प्रथम क्रमांकास ५१,००१ रुपये, द्वितीय ४१,००१, तृतीय ३१,००१ व चतुर्थ २१,००१ रुपये देण्यात येणार आहेत. ‘घाटाचा राजा’साठी भव्य ट्रॉफी व खिलार बॅग तसेच फायनलसाठी स्वतंत्र रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. टोकन वाटप रविवार दि. १८ जानेवारी रोजी सकाळी ८ ते १२ या वेळेत होणार असून, टोकन फी १,००० रुपये असेल. यामध्ये ५०० रुपये परत व ५०० रुपये देणगी स्वरूपात स्वीकारले जातील. टोकन फी ऑनलाईन स्वीकारली जाणार नसून, एका व्यक्तीस एकच टोकन दिले जाईल. बुधवार दि. २१ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता देवास दंडवत व शेरणी कार्यक्रम होणार आहे.

# निरगुडसरच्या शेतकरी कन्येचे वैद्यकीय क्षेत्रात घवघवीत यश

## डॉ. शितल शिंदे यांना एमडी पदवी; राज्यात दुसरा क्रमांक; तालुक्याचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** लोणी-धामणी : प्रतिनिधी | निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील पं. ज. नेहरू माध्यमिक व द. गो. वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयाची माजी विद्यार्थिनी आणि शेतकरी कुटुंबातील सुकन्या डॉ. शितल रंगनाथ शिंदे हिने वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथून मास्टर ऑफ डॉक्टरेट (एमडी) ही पदवी मिळवत राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे निरगुडसर गावासह संपूर्ण आंबेगाव तालुक्यात अभिमान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही डॉ. शितल शिंदे हिने आपल्या शिक्षणप्रवासात अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. मात्र जिद्द, चिकाटी, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कठोर परिश्रमाच्या बळावर तिने प्रत्येक अडथळ्यावर मात करत हे यश संपादन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तिची ही यशोगाथा प्रेरणादायी ठरत आहे.

या यशामागे आपले शिक्षक, वडील रंगनाथ शिंदे, आई मंगल शिंदे, भाऊ साक्षर शिंदे, वहिनी निशा शिंदे यांच्यासह मामा विजय थोरात, सुरेश थोरात, सुभाष थोरात व सोपान थोरात यांचे मोलाचे मार्गदर्शन व पाठबळ लाभल्याचे डॉ. शितल शिंदे हिने नमूद केले. कुटुंबीयांनी दिलेली प्रेरणा, विश्वास आणि सततचा आधार यामुळेच हे यश शक्य झाले, असे तिने सांगितले.

दरम्यान, राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी डॉ. शितल शिंदे हिचे अभिनंदन करत तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातून येऊन वैद्यकीय शिक्षणात एवढे मोठे यश मिळवणे ही बाब कौतुकास्पद असून तिचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

डॉ. शितल शिंदेच्या या घवघवीत यशाबद्दल तिचा विद्यालयाच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्राचार्य कांताराम टाव्हरे, पर्यवेक्षक संतोष वळसे, माजी प्राचार्या सुनंदा गोरे, मेंगडेवाडीचे सरपंच बाळासाहेब मेंगडे, रंगनाथ शिंदे, विठ्ठल गवारी तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंबेगाव तालुक्यात पंचायत समिती–जिल्हा परिषद निवडणुकांचे वारे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यात पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांची घोषणा होताच राजकीय हालचालींना वेग आला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी तयारीला सुरुवात केली असून, अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यासाठी बैठका, चर्चा आणि आढावे घेण्याचे सत्र सुरू झाले आहे. इच्छुक उमेदवारांनी पक्ष नेतृत्वाशी संपर्क वाढवला असून पक्षांतर्गत चाचपणीला गती आली आहे.

या निवडणुकीत आंबेगाव तालुक्यात पंचायत समितीच्या एकूण दहा गणांसाठी तर जिल्हा परिषदेच्या पाच गटांसाठी मतदान होणार आहे. त्यामुळे प्रत्येक गण आणि गट अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, पक्षांकडून जिंकण्याच्या दृष्टीने सक्षम व लोकप्रिय उमेदवार देण्यावर भर दिला जात आहे. स्थानिक राजकारणातील वजनदार नेते, सामाजिक प्रतिनिधित्व आणि मतदारांवरील पकड या बाबी लक्षात घेऊन उमेदवारीबाबत निर्णय घेतले जात असल्याचे चित्र आहे. सध्या संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत असून, स्थानिक समीकरणे, सामाजिक समतोल, जातीय गणित मागील निवडणुकांचे निकाल यांचा सखोल अभ्यास केला जात

## कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे : इंदापूर–बावडा महाविद्यालयांच्या संयुक्त NSS विशेष हिवाळी शिबिराचा समारोप

# राष्ट्रीय सेवा योजनेतून युवकांमध्ये समाजभान निर्माण होते!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** इंदापूर : कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर तसेच श्रीमती रत्नप्रभादेवी महाविद्यालय, बावडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विशेष हिवाळी शिबिराचा समारोप समारंभ गुरुवारी (दि. १५ जानेवारी २०२६) नीरा भीमा सहकारी साखर कारखाना, शहाजीनगर येथे उत्साहात पार पडला. हे शिबिर दि. ९ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते.

समारोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांमध्ये समाजभान, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणारी प्रभावी चळवळ असल्याचे सांगितले. NSS स्थापनेमागील उद्देश स्पष्ट करताना त्यांनी देशाच्या जडणघडणीत युवकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून स्वयंसेवकांनी सामाजिक प्रश्नांची जाणीव ठेवून कार्य करावे, असे आवाहन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी डॉ. संजीव सोनवणे यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवाचा आढावा घेत विद्यार्थ्यांनी उपक्रमशीलतेचे महत्त्व ओळखून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव ॲड. मनोहर चौधरी होते. त्यांनी शिबिर काळात स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी केलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक करत त्यांच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास संस्थेचे संचालक विलासबापू वाघमोडे, संचालक सुरेश मेहेर, इंदापूर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे, डॉ. शिवाजी वीर, डॉ. भरत भुजबळ, शहाजीनगरच्या सरपंच सौ. राधिका प्रशांत गोसावी, माणिकराव खाडे, किसनराव खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्वयंसेवक व स्वयंसेविकांचा कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. उत्तम माने यांनी केले. बावडा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लहू वावरे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. महंमद मुलाणी यांनी शिबिर कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

शिबिर काळातील कामाचा सविस्तर अहवाल प्रा. नामदेव पवार व मयूर मखरे यांनी सादर केला असून त्याचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरादरम्यान शहाजीनगर गावाची स्वच्छता, वृक्षारोपण, पथनाट्यांद्वारे जनजागृती, गावाचे भौगोलिक व आर्थिक सर्वेक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच सलग समतल चर बांधणीसारखे उपक्रम राबविण्यात आले.

## सारांश वृत्त

### सामान्य कुटुंबातील मुलाचे प्रेरणादायी काम

**नागपूर :** नागपूर महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने घवघवीत यश मिळवत स्पष्ट बहुमताच्या दिशेने मजल मारली असताना, या निकालातून एक विशेष प्रेरणादायी कथा समोर आली आहे. सामान्य कुटुंबातून पुढे येत गणेश चर्लेवार यांनी प्रभाग क्रमांक ३१ मधून विजय मिळवत राजकारणात स्वतःची ठळक ओळख निर्माण केली आहे. नागपूर महापालिकेत शिपाई म्हणून सेवा देणाऱ्या वडिलांचा मुलगा थेट नगरसेवक बनल्याने हा विजय केवळ राजकीय न राहता सामाजिक संदेश देणारा ठरला आहे.

### गिरणगावात ठाकरे बंधूंचाच झेंडा

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकांची मतमोजणी सुरु असून लालबाग-परळच्या बालेकिल्ल्यात ठाकरे बंधूंचाच झेंडा फडकल्याचं पाहायला मिळत आहे. गिरणगावचा गड ठाकरे बंधूंनी राखला. गिरण गावातील ७ प्रभागांपैकी ६ प्रभागांमध्ये ठाकरे बंधूंचे उमेदवार विजयी झाले आहेत. सातपैकी सहा जागांवर ठाकरे बंधूंचा विजय झाला, तर एका जागेवर समाजवादी पक्षाचा विजय झाला. श्रद्धा जाधव, किरण तावडे यांच्यासह ठाकरे बंधूंच्या युतीच्या सहा उमेदवारांनी विजय मिळवला.

### आंदेकर याची पत्नी आणि सून विजयी

**पुणे :** पुणे महापलिका निवडणुकीचे निकाल आता स्पष्ट होताना दिसत आहेत. यामधील लक्षवेधी असणाऱ्या निवडणुकांमध्ये कुख्यात गुंड बंडू आंदेकर याची पत्नी लक्ष्मी आंदेकर आणि सून सोनाली आंदेकर यांचे निकाल समोर आले आहेत. पुण्यातील माजी आमदार रविंद्र धंगेकर यांच्या पत्नी प्रतिभा धंगेकर आणि सोनाली आंदेकर यांच्यात लढत झाली होती. तुरूंगातून निवडणूक लढवणाऱ्या सोनाली आंदेकरने प्रतिभा यांचा पराभव केला आहे. सोनालीच नाहीतर बंडू आंदेकर याची पत्नी लक्ष्मीनेही विजय मिळवला आहे. आंदेकर कुटुंबाने आपले वर्चस्व दाखवून दिले आहे.

## कल्याण-डोंबिवलीत भाजपची जोरदार मुसंडी

# ठाण्यात शिंदेसेनेचे वर्चस्व कायम



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ठाणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गड असलेल्या ठाणे शहराच्या महापालिकेतील सत्ता पुन्हा शिंदेसेनेने राखली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा शिंदेसेनेच्या ठाण्यातील वर्चस्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. ठाण्यातीलच कल्याण डोंबिवली (केडीएमसी) महानगरपालिकेत मात्र भाजपने जोरदार मुसंडी मारली असून भाजपने प्रथमच या महापालिकेत शिंदेसेनेच्या वर्चस्वाला आव्हान दिले आहे.

मात्र, दोन्ही तुल्यबळ योद्ध्यांच्या लढतीमध्ये विरोधक भूईसपाट झाले आहेत. ठाणे महानगरपालिकेत ठाकरेसेना, मनसे व शरदचंद्र पवार पक्षाने आघाडी केली होती. तर दुसऱ्या बाजूला शिंदेसेना, भाजप व रिपाई यांनी युती करताना निवडणूकीला सामोरे गेले. एकूण ३३ प्रभाग असलेल्या ठाणे महानगरपालिकेत शिंदेसेनेच्या प्रभाग १९ मधील चारही नगरसेवकांनी विजयाने सुरुवात केली. यानंतर प्रभाग क्रमांक ४- ड मध्ये शिंदेसेनेच्या सिद्धार्थ पांडेने विजयी पताका फडकवल्यानंतर टेंभी नाक्यावर आनंद आश्रमाजवळ कार्यकर्त्यांनी विजयी जल्लोष करण्यास सुरुवात केली. त्यानंतर शिंदेसेनेने शेवटचे कल हाती आले तोपर्यंत ४० तर भाजपने २४ जागांवर विजय साकारला होता. १३१ नगरसेवक असलेल्या ठाणे महानगर पालिकेत बहुमतसाठी आवश्यक असलेला आकडा महायुतीने सहज गाठला असून विरोधकांना दोन आकडी संख्या देखील गाठता आलेली नाही.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत देखील महायुतीने आपला झेंडा रोवला आहे. १२२ जागा असलेल्या महानगरपालिकेत शिंदेसेना व भाजपने केवळ नावाला विरोधक शिल्लक ठेवले आहेत. या महापालिकेवर गेल्या काही वर्षांपासून शिंदेसेनेचे वर्चस्व होते. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे याच लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे शिंदेसेनेचे वर्चस्व राखणे स्वाभाविक होते. भाजपने डोंबिवलीचे आमदार असलेल्या रवींद्र चव्हाणांकडे प्रदेशाध्यक्ष पद सोपविले. त्यानंतर या भागामध्ये भाजपने देखील आपली ताकद पणाला लावली. मात्र उमेदवारीसाठी रस्सीखेच झाली असली तरी देखील युती शाबूत राहिल्याने विरोधात असलेल्या ठाकरेसेना, मनसे, कॉंग्रेस, शरदचंद्र पवार पक्षांच्या हाती काहीही लागले नाही. ठाणे महानगर पालिकेसारखेच या महापालिकेत देखील विरोधकांना दोन आकडी संख्या गाठता आली नाही.

## जनतेचा कौल सर्वोच्च; तो आदराने स्वीकारतो



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकांच्या निकालांवर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनतेच्या निर्णयाचा आदर व्यक्त केला आहे. "जनतेचा कौल हा सर्वोच्च असतो आणि तो आम्ही पूर्ण आदराने स्वीकारतो," असे स्पष्ट मत अजित पवार यांनी मांडले. निवडणुकीत विजयी झालेल्या सर्व उमेदवारांचे त्यांनी मनापासून अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

अजित पवार म्हणाले की, "स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकांमध्ये ज्या ठिकाणी अपेक्षित यश मिळाले नाही, त्या ठिकाणी जनतेचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही अधिक जबाबदारीने, प्रामाणिकपणे आणि दुप्पट जोमाने काम करत राहू." तसेच, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी आपापल्या महानगरपालिकांमध्ये जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकास आणि लोककल्याणाच्या कामांना गती द्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

याशिवाय, पराभूत उमेदवारांनाही संदेश देताना ते म्हणाले की, जे उमेदवार विजयी होऊ शकले नाहीत त्यांनी निराश न होता जनतेसाठी कार्यरत राहावे. जनतेचे भले आणि लोकहित हेच केंद्रस्थानी ठेवून अखंडपणे काम करणे, हेच आपले ध्येय असले पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे.

## महाराष्ट्रातील जनतेचे आभार : पंतप्रधान मोदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील २९ महापालिकांचा निकाल समोर येत आहे. या महापालिकांमध्ये काही मोजके शहर वगळता इतर सर्व ठिकाणी भाजपला घवघवीत यश मिळताना दिसत आहे. २९ महापालिकांपैकी मुंबई महापालिकेची निवडणूक जास्त महत्त्वाची मानली जात होती. कारण गेल्या तीन दशकांपासून ठाकरेंच्या शिवसेनेची इथे सत्ता होती. अखेर या ठिकाणी भाजपची सत्ता येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. मुंबईत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार १२१ जागांवर आघाडीवर दिसत आहेत. हे कल कायम राहिले तर मुंबईत भाजपची सत्ता येण्याची दाट शक्यता आहे. या महापालिका निकालांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

"महाराष्ट्राचे आभार! राज्यातील उत्साही जनतेने एनडीएच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले आहेत. विविध महानगरपालिका निवडणुकांचे निकाल हे दर्शवितात की महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ झाले आहे. आमच्या कामगिरीचा अनुभव आणि विकासाची दृष्टी जनतेच्या मनाला भावली आहे. महाराष्ट्रातील सर्व जनतेप्रती मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. हा कौल प्रगतीला अधिक गती देणारा, राज्याशी जोडलेल्या गौरवशाली संस्कृतीचा उत्सव साजरा करणारा आहे. महाराष्ट्रभर जनतेसोबत राहून अहोरात्र परिश्रम करणाऱ्या एनडीएच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा मला अभिमान आहे. त्यांनी आमच्या युतीच्या कामगिरीबाबत माहिती देताना, आगामी काळासाठीचा आमचा दृष्टीकोण ही अधोरेखित केला आणि विरोधकांच्या खोट्या आरोपांना प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा", अशा शब्दांत मोदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## जिल्हा परिषदेत भाजपाचा स्वबळाचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महापालिकेच्या निकालानंतर भाजपने आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पक्षाने स्पष्ट केले आहे की या निवडणुका भाजप स्वबळावर लढवणार आहे. या निर्णयाची घोषणा भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत करण्यात आली.

राज्यातील महापालिकांमध्ये भाजपने जोरदार कामगिरी केली आहे. मुंबई, पुणे, नागपूर आणि इतर महत्त्वाच्या शहरांमध्ये भाजपचा झेंडा



फडकण्याची शक्यता आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांमध्ये भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) जोरदार धक्का दिला आहे. या निकालानंतर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांमध्ये भाजपाचाच महापौर बसणार असल्याचे जवळजवळ निश्चित झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर आता भाजपने आगामी जिल्हा परिषद निवडणुकीतही अजित पवार गटापासून स्वतंत्र वाटचाल करण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. महापालिका निवडणुकांमध्ये भाजपने अजित पवारांच्या राष्ट्रवादीला सत्तेत असूनही सोबत घेतले नव्हते. राष्ट्रवादीने अनेक ठिकाणी स्वतंत्र लढत दिली, मात्र अपेक्षित यश मिळू शकले नाही. याच पार्श्वभूमीवर आता आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपने स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली आहे. पुणे जिल्हा परिषद निवडणूक स्वबळावर लढवण्याचा ठाम निर्धार बैठकीत व्यक्त केला गेला.

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोशल मीडियावर याबाबत माहिती दिली आणि स्पष्ट केले की, पुणे जिल्हा परिषद निवडणुकीच्या तयारीसाठी आज माझ्या व केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत आगामी निवडणुकीची रणनिती, संघटनात्मक मजबुती आणि उमेदवार निवडीबाबत सविस्तर चर्चा झाली. पुणे जिल्हा परिषद निवडणूक भाजपने स्वबळावर लढवावी, असा ठाम सूर या बैठकीत उमटला. या बैठकीस पुणे उत्तर व पुणे दक्षिणचे जिल्हाध्यक्ष, वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेना शिंदेंची महापौरपदाची मागणी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** विधानसभा निकालाचे आकडे पाहून मुख्यमंत्रिपदावर दावा सांगणारे एकनाथ शिंदे यांनी पुन्हा मुंबई महापालिकाच्या निकालाचे आकडे पाहून महापौरपदावर दावा सांगितला आहे. ठाकरे बंधूंची निकराची लढाई आणि कॉंग्रेस पक्षाच्या २० पेक्षा अधिक जागा आल्याने मुंबईचा निकाल काहीसा त्रिशंकू अवस्थेत गेल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी गुगली टाकली. मुंबईत आम्हाला अडीच वर्षांसाठी महापौरपद हवे आहे, अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महानगर पालिकेत ठाकरे बंधू आणि महायुतीत निकराची लढाई सुरू आहे. सुरुवातीला महायुतीला स्पष्ट बहुमत मिळेल, असे चित्र होते. मात्र त्यानंतर ठाकरे बंधूंचे आकडे हळूहळू वाढायला लागले. तसेच कॉंग्रेस पक्षानेही २० पेक्षा अधिक जागा जिंकून किंगमेकरच्या भूमिकेत असल्याचे दाखवून दिले. हे सारे चित्र पाहून महायुतीतील भाजपचा मित्रपक्ष शिवसेनेने मुंबईचे महापौरपद आम्हाला हवे आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. निकालाची मतमोजणी शुक्रवारी सकाळी १० वाजता सुरू झाली. पहिल्या कलांपासूनच ठाकरे बंधू आणि भाजपमध्ये जोरदार संघर्ष होता. दुपारपर्यंत चित्र पालटले. महायुतीची शतकाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. परंतु शिवसेनेच्या बालेकिल्ल्यातील निकाल चार नंतर यायला लागले. तेव्हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा आकडा वाढला. कॉंग्रेस पक्षानेही २२ पेक्षा अधिक नगरसेवक जिंकून आपली ताकद दाखवून दिली. आश्चर्यकारक म्हणजे एमआयएमने मुंबई शहरात आठ नगरसेवक निवडून आणले आहेत. या आकड्यांनी मुंबईच्या निकालात ट्विस्ट आलेला असताना एकनाथ शिंदे यांनी महापौरपदाची मागणी करून भाजपला खिंडीत गाठण्याचा प्रयत्न केला.

## मुंबईत कॉंग्रेस–वंचित युतीने बदलले राजकीय गणित

# मतविभाजनाचा फटका ठाकरेंना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या मतमोजणीदरम्यान एक महत्त्वाचे आणि निर्णायक राजकीय वास्तव समोर येत आहे. ज्या 'मतविभाजनाची' भीती निवडणुकीपूर्वी व्यक्त केली जात होती, ती भीती आता प्रत्यक्ष निकालांतून खरी ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईतील अनेक वॉर्डमध्ये कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्या युतीमुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि ठाकरे बंधूंना मोठा फटका बसल्याचे चित्र दिसून येत आहे.

मुंबईत शिवसेना (ठाकरे), कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) यांची महाविकास आघाडी जाहीर असली, तरी प्रत्यक्षात जागावाटपाचा तिढा सुटू शकला नाही. अनेक वॉर्डमध्ये आघाडीतील दोन किंवा तीन पक्षांचे उमेदवार एकमेकांविरुद्ध उभे राहिले. या गोंधळाचा थेट फायदा भाजपला झाला. काही ठिकाणी अत्यल्प मताधिक्याने भाजपने विजय मिळवला, तर त्या मतांमध्ये कॉंग्रेस, वंचित, मनसे किंवा इतर विरोधी उमेदवारांची मते विभागली गेल्याचे स्पष्ट झाले आहे.

या निवडणुकीत कॉंग्रेसने महाविकास आघाडीतून बाहेर पडत प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीशी हातमिळवणी केली. 'मुंबई विकास आघाडी'च्या नावाखाली ही युती उभी राहिली. या आघाडीने प्रामुख्याने मुस्लीम आणि दलित बहुल वॉर्डमध्ये जोरदार प्रचार केला. मात्र या रणनीतीचा थेट फटका ठाकरे गटाला बसल्याचे निकालांतून दिसून आले.

अनेक वॉर्डमध्ये चित्र जवळपास सारखेच होते. भाजप किंवा शिंदे गटाचा उमेदवार तुलनेने कमी मतांत विजयी झाला, तर ठाकरे गटाचा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिला. कॉंग्रेस किंवा वंचितचा उमेदवार स्वतंत्रपणे लढल्याने ठाकरे गटाची मते फुटली आणि विजय हातातून निसटला. काही ठिकाणी मनसेचीही हीच भूमिका ठरली. मनसेला फारशी मोठी मजल मारता आली नसली, तरी त्यांच्या उमेदवारांनी निर्णायक मते खेचून घेतल्याने ठाकरे गटाचा पराभव झाला.

गिरणगाव, उपनगरं आणि मिश्र लोकसंख्येच्या वॉर्डमध्ये हा परिणाम अधिक ठळकपणे दिसून आला. परंपरागतपणे शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या भागांमध्येही मतदारांमध्ये संभ्रम दिसून आला. एकीकडे ठाकरे गट, दुसरीकडे कॉंग्रेस-वंचित, तर तिसरीकडे मनसे – अशा तिहेरी लढतीत भाजप किंवा शिंदे गटाने संधी साधली.

राजकीय विश्लेषकांच्या मते, ही निवडणूक केवळ पक्षांची ताकद दाखवणारी नाही, तर रणनीतीतील चुकांचेही जिवंत उदाहरण ठरली आहे. आघाडी जाहीर असताना जर स्थानिक पातळीवर समन्वय नसेल, तर त्याचा फायदा थेट विरोधकाला होतो, हे मुंबईच्या निकालांनी अधोरेखित केले आहे. विशेषतः ठाकरे गटासाठी हा इशारा मानला जात आहे. या निकालांमुळे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संभाव्य युतीबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. मराठी माणूस, मुंबईची अस्मिता आणि भावनिक मुद्दे उपस्थित करूनही जर मतविभाजन रोखता आले नाही, तर भविष्यातील निवडणुकांत आव्हान अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कॉंग्रेस–वंचित युतीमुळे निर्माण झालेल्या मतविभाजनाने ठाकरे गटाचे गणित बिघडवले असून, भाजप आणि शिंदे गटासाठी ही परिस्थिती निर्णायक ठरल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

## मुंबई महापालिका विजय आणि 'रसमलाई' ट्रेंड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीचे निकाल येताच सोशल मीडियावर एक अनोखा ट्रेंड पसरण्यास सुरुवात झाली आहे – रसमलाई!

मुंबई महापालिकेत भाजपने मुसंडी मारल्यानंतर राजकीय गणिते तर बदललीच आहेत, पण सोशल मीडियावर एक वेगळंच 'युद्ध' पाहायला मिळत आहे. हे युद्ध आहे 'रसमलाई'चे! निकाल हाती येताच नेटिझन्सनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना उद्देशून रसमलाईचे फोटो आणि



मीम्स शेअर करायला सुरुवात केली आहे.

निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजपचे तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई हे मुंबईत भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी "मुंबई हे केवळ महाराष्ट्राचे शहर नसून ते एक आंतरराष्ट्रीय शहर आहे," असे विधान केले होते.

या विधानावर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी शिवाजी पार्क येथील सभेत संताप व्यक्त केला होता. अन्नामलाई यांच्या नावाचा उच्चार करत त्यांनी उपहासाने म्हटले होते, "कुठली तरी 'रसमलाई' तामिळनाडूवरून आली आहे आणि आम्हाला मुंबईबद्दल शिकवतेय!" इतकेच नव्हे तर त्यांनी जुना 'हटाओ लुंगी, बजाओ पुंगी' हा नाराही पुन्हा दिला होता. मात्र, आज जेव्हा निकालांमध्ये भाजप आणि शिंदे गटाच्या महायुतीने मुंबईत स्पष्ट बहुमत मिळवले, तेव्हा भाजपने याच 'रसमलाई' शब्दाचा वापर करून राज ठाकरेंना टार्गेट केले आहे.

सोशल मीडियावर भाजप समर्थक लिहीत आहेत की, ज्यांना तुम्ही 'रसमलाई' म्हणून हिणवले, त्यांनीच मुंबईत भाजपला मोठे यश मिळवून दिले. भाजप खासदार तेजस्वी सूर्या आणि पी.सी. मोहन यांनी सोशल मीडियावर रसमलाईचे फोटो शेअर करून "#RasmalaiVictory" असे हॅशटॅग चालवले आहेत. "भाजपच्या या विजयाची चव रसमलाईसारखी गोड आहे," अशा आशयाच्या पोस्ट सध्या व्हायरल होत आहेत.

## नाशिकमध्ये भाजपची एकहाती सत्ता

**नाशिक :** नाशिकमध्ये भाजपला एकहाती सत्ता मिळविण्यात यश आले आहे. भाजपचे ७२ उमेदवार विजयी झाले आहेत. तर शिंदेंची शिवसेना २६ आणि ठाकरेंची शिवसेना ११ जागांवर जिंकली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ४ उमेदवार जिंकलेत. भाजपने एकहाती बहुमताचा ७२ हा जादुई आकडा पार केला आहे. तर एकनाथ शिंदेंची शिवसेना दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाजपने नाशिक महापालिका निवडणूक प्रतिष्ठेची केली होती.

## गौरी लंकेश हत्या प्रकरणातील आरोपी नगरसेवक झाला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जालना :** निर्भीड पत्रकार गौरी लंकेश यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी तसेच नालासोपारा बॉम्बस्फोटातील आरोपी श्रीकांत पांगरकर यांनी जालना महापालिका निवडणुकीत विजय मिळवला. प्रभाग क्रमांक १३ ड मधून त्यांनी विजयाचा गुलाल उधळला. माझ्यावरील आरोपाचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे परंतु जनतेच्या न्यायालयात मला आज न्याय मिळाला, अशी प्रतिक्रिया श्रीकांत पांगरकर यांनी दिली.

जालन्याच्या १६ प्रभागातील ६५ जागांसाठी निवडणूक झाली. निवडणूक निकालात भारतीय जनता पक्षाने ४१ पेक्षा अधिक जागा जिंकल्या. याचाच अर्थ भाजपने जालना महापालिकेत स्वबळावर सत्ता मिळवली आहे. या निकालांत बॉम्बस्फोट आणि गौरी लंकेश यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी श्रीकांत पांगरकर यांच्या विजयाची देशभर चर्चा होत आहे.

श्रीकांत पांगरकर यांची ओळख कट्टर हिंदुत्ववादी कार्यकर्ता अशी आहे. एकसंध शिवसेना असताना त्यांनी नगरसेवक म्हणून काम केले होते. २०१८ मध्ये बॉम्ब बनविण्यासाठी लागणारे साहित्य पांगरकर यांच्याकडून जप्त करण्यात आले होते. दहशतवाद विरोधी पथकाने त्यांच्यावर अटकेची कारवाई केली होती. त्यानंतर ते जामिनावर तुरुंगातून बाहेर आले. त्यानंतर त्यांनी राजकारणात जम बसवायला सुरुवात केली.

## भाजपाच्या लाटेत विरोधकांची वाताहात

# स्थैर्य, विकास आणि कामगिरीला प्राधान्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांचे निकाल प्रत्यक्षात समोर येऊ लागल्याने राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाल्याचे स्पष्ट होत आहे. मतमोजणीला सुरुवात झाल्यापासूनच भाजप–शिवसेना महायुतीने राज्यभर आघाडी घेतल्याचे चित्र ठळकपणे दिसून येत असून, दीर्घकाळ ठाकरेंच्या ताब्यात असलेली मुंबई महानगरपालिकाही या लाटेत हादरल्याचे संकेत मिळत आहेत.

मुंबईत महायुती बहुमताच्या दिशेने निर्णायक वाटचाल करत आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचा



बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मुंबईत उबाठा गट आणि मनसे एकत्र विरोधात उतरले असतानाही त्यांना अपेक्षित यश मिळालेले नाही. मराठी माणूस, स्थानिक मुद्दे आणि भावनिक आवाहनांवर भर देण्यात आला असला, तरी मतदारांनी यावेळी स्थैर्य, विकास आणि प्रशासनाच्या कामगिरीला प्राधान्य दिल्याचे चित्र आहे. कॉंग्रेसलाही या लढतीत मर्यादितच प्रभाव पाडता आला.

मुंबई महापालिकेचा निकाल राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. देशातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संस्थेवरील सत्ता म्हणजे केवळ शहराच्या कारभारावर नियंत्रण नव्हे, तर राज्याच्या राजकारणावर प्रभाव टाकणारे बळही आहे. त्यामुळेच मुंबईत मिळालेली आघाडी ही महायुतीसाठी केवळ स्थानिक यश न ठरता व्यापक राजकीय ताकदीचे प्रतीक मानली जात आहे.

मुंबईपुरतेच नव्हे, तर पुणे आणि पिंपरी-चिंचवड या औद्योगिक व शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाच्या शहरांमध्येही महायुतीचे पारडे जड असल्याचे चित्र आहे. या शहरांमध्ये राष्ट्रवादीसह इतर विरोधकांना मागे टाकत भाजपने आघाडी घेतली आहे. ठाणे महानगरपालिकेतही महायुतीची स्थिती भक्कम असल्याचे संकेत असून, एकूणच शहरी महाराष्ट्रात सत्ताधाऱ्यांचा प्रभाव वाढताना दिसत आहे. नाशिक, नागपूर, नवी मुंबईसह इतर अनेक महानगरपालिकांमध्येही महायुतीची पकड अधिक मजबूत झाल्याचे दिसून येते. या निकालांतून शहरी मतदारांचा कल स्पष्ट होत असून, केवळ राजकीय घोषणांपेक्षा कामगिरी, विकास प्रकल्प, पायाभूत सुविधा आणि प्रशासनातील स्थैर्य यांचा विचार करूनच निर्णय घेतल्याचे अधोरेखित होते.

राजकीय विश्लेषकांच्या मते, या निकालांचा परिणाम आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांवर होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मिळालेला कौल हा मोठ्या निवडणुकांसाठी दिशादर्शक मानला जातो. महायुतीसाठी हा आत्मविश्वास वाढवणारा टप्पा ठरत असताना, विरोधी पक्षांसाठी मात्र हे निकाल चिंतनाची घंटा मानले जात आहेत.

उद्धव ठाकरे, मनसे तसेच कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीसाठी संघटनात्मक बांधणी, परस्पर समन्वय आणि स्पष्ट राजकीय दिशा यांचा अभाव या निवडणुकांत उघड झाला. अस्तित्व टिकवण्यासाठी विरोधकांना नव्या रणनीतीची गरज भासणार असल्याचे स्पष्ट होत आहे. भाजप–शिवसेना महायुतीने शहरी भागात आपला दबदबा प्रस्थापित केला आहे, ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात मिळालेली आघाडी ही राजकारणातील पुढील घडामोडींचे संकेत देणारी ठरत आहे.



# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपचा एकहाती विजय!

## महायुतीतील चुरशीच्या लढतीतही भाजपाचे वर्चस्व कायम, अजित पवारांचा प्रचार फिका



दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी काल पार पडलेल्या निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाले असून, त्यातून भारतीय जनता पार्टीचे शहरी भागातील वर्चस्व ठळकपणे समोर आले आहे. मुंबईनंतर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या निकालांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. या दोन्ही महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्येही भाजपाने मुंबईप्रमाणेच मोठा आणि निर्णायक विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातच मुख्य लढत रंगली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या दोन्ही शहरांमध्ये जोरदार प्रचार करत ताकद लावल्याने निवडणूक अत्यंत चुरशीची होईल, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र, प्रत्यक्ष निकालात भाजपाने दोन्ही महापालिकांमध्ये एकहाती आघाडी घेत विरोधकांना मागे टाकले आहे. पुणे महानगरपालिकेत विकासकामांचा मुद्दा, स्थिर नेतृत्व आणि संघटनात्मक ताकदीच्या जोरावर भाजपाने मतदारांचा विश्वास संपादन केल्याचे निकालांतून स्पष्ट झाले. पिंपरी-चिंचवडमध्येही पायाभूत सुविधा, उद्योगपूरक धोरणे आणि शहरी विकासाच्या मुद्द्यांवर भाजपाला मोठे यश मिळाले. राष्ट्रवादी (अजित पवार गट) कडून जोरदार प्रचार होऊनही अपेक्षित यश न मिळाल्याने महायुतीतील अंतर्गत राजकीय गणितांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एकूणच, राज्यातील बहुतांश महानगरपालिकांमध्ये भाजपाचे वर्चस्व दिसून येत असून, शहरी मतदारांचा कल स्पष्टपणे भाजपकडे झुकलेला असल्याचे या निकालांनी अधोरेखित केले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील हा विजय भाजपासाठी आगामी विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात असून, राज्याच्या राजकारणात त्याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे.

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- 2026 I विजयी उमेदवारांची यादी

### प्रभाग क्रमांक - १
1. विकास साने – राष्ट्रवादी
2. सोनम मोरे – भाजप
3. संगीता ताम्हाणे – राष्ट्रवादी
4. यश साने – राष्ट्रवादी

### प्रभाग क्रमांक - २
1. सुजाता बोराटे – भाजप
2. सारिका बोऱ्हाडे – भाजप
3. राहुल जाधव – भाजप
4. निखिल बोऱ्हाडे – भाजप

### प्रभाग क्रमांक - ३
1. गायकवाड सारिका – भाजप
2. नितीन काळजे – भाजप
3. अर्चना सस्ते – भाजप
4. सचिन तापकीर – भाजप

### प्रभाग क्रमांक - ४
1. श्रुती डोळस – भाजप
2. कृष्णा सुरकुले – भाजप
3. हिराबाई घुले – भाजप
4. उदय गायकवाड – भाजप

### प्रभाग क्रमांक - ५
1. भीमाबाई फुगे – राष्ट्रवादी
2. सागर गवळी – भाजप
3. कविता भोंगाळे – भाजप
4. जालिंदर शिंदे – भाजप

### प्रभाग क्रमांक - ६
1. देवकर रेखा देवराम – भाजप
2. लांडगे रवी – भाजप
3. लांडगे राजश्री – भाजप
4. लांडगे योगेश – भाजप

### प्रभाग क्रमांक - ७
1. विराज लांडे – राष्ट्रवादी
2. सोनाली गव्हाणे – भाजप
3. राणी पठारे – भाजप
4. नितीन लांडगे – भाजप

### प्रभाग क्रमांक - ८
1. कांबळे सुहास – भाजप
2. लोंढे नम्रता – भाजप
3. वाबळे अश्विनी – राष्ट्रवादी
4. सहाणे तुषार – राष्ट्रवादी

### प्रभाग क्रमांक - ९
1. सिद्धार्थ बनसोडे – राष्ट्रवादी
2. वैशाली घोडेकर – राष्ट्रवादी
3. सारिका मासुळकर – राष्ट्रवादी
4. राहुल भोसले – राष्ट्रवादी

### प्रभाग क्रमांक - १०
1. अनुराधा गोरखे – भाजप
2. कुशाग्र कदम – भाजप
3. सुप्रिया चांदगुडे – भाजप
4. तुषार हिंगे – भाजप

### प्रभाग क्रमांक - ११
1. गायकवाड कुंदन – भाजप
2. रिटा सानप – भाजप
3. योगिता नागरगोजे – भाजप
4. निलेश नेवाळे – भाजप

### प्रभाग क्रमांक - १२
1. भालेकर प्रवीण – भाजप
2. शीतल वर्णेकर – भाजप
3. शिवानी नरळे – भाजप
4. पंकज भालेकर – राष्ट्रवादी

### प्रभाग क्रमांक - १३
1. बाप्पू घोलप – भाजप
2. अर्चना कारंडे – भाजप
3. सुलभा उबाळे – शिवसेना
4. उत्तम केंदळे – भाजप

### प्रभाग क्रमांक - १४
1. कैलास कुटे – भाजप
2. वैशाली काळभोर – राष्ट्रवादी
3. लंगोटे अरुणा – राष्ट्रवादी
4. प्रमोद कुटे – राष्ट्रवादी

### प्रभाग क्रमांक - १५
1. राजू मिसाळ – भाजप
2. मोरे शैलजा – भाजप
3. शर्मिला बाबर – भाजप
4. अमित गावडे – भाजप

### प्रभाग क्रमांक - १६
1. तंतरपाळे धर्मपाल – भाजप
2. ऐश्वर्या तरस – शिवसेना
3. रेश्मा कातळे – शिवसेना
4. निलेश तरस – शिवसेना

### प्रभाग क्रमांक - १७
1. आशा सूर्यवंशी – भाजप
2. भाऊसाहेब भोईर – राष्ट्रवादी काँग्रेस
3. पल्लवी वाल्हेकर – भाजप
4. शेखर चिंचवडे – राष्ट्रवादी काँग्रेस

### प्रभाग क्रमांक - १८
1. अपर्णा डोके – भाजप
2. मनिषा चिंचवडे – भाजप
3. अनंत कोऱ्हाळे – राष्ट्रवादी
4. सुरेश भोईर, – भाजप

### प्रभाग क्रमांक - १९
1. मधुरा शिंदे – भाजप
2. श्री. शितल शिंदे – भाजप
3. जयश्री गावडे – भाजप
4. मंदार देशपांडे – भाजप

### प्रभाग क्रमांक - २०
1. जितेंद्र ननावरे – राष्ट्रवादी
2. वर्षा जगताप – राष्ट्रवादी
3. मनिषा लांडे – राष्ट्रवादी
4. योगेश बहल – राष्ट्रवादी

### प्रभाग क्रमांक - २१
1. निकिता कदम – राष्ट्रवादी
2. संदीप वाघेरे – राष्ट्रवादी
3. प्रियंका कुदळे – राष्ट्रवादी
4. डब्बू असवानी – राष्ट्रवादी

### प्रभाग क्रमांक - २२
1. नीता पाडळे –भाजप
2. कोमल काळे –भाजप
3. विनोद नढे –भाजप
4. संतोष कोकणे – राष्ट्रवादी काँग्रेस

### प्रभाग क्रमांक - २३
1. मनिषा पवार – भाजप
2. तान्हाजी बारणे – भाजप
3. बारणे योगिता – राष्ट्रवादी
4. अभिषेक बारणे – भाजप

### प्रभाग क्रमांक - २४
1. विश्वजीत बारणे – शिवसेना
2. शालिनी गुजर – अपक्ष
3. माया बारणे – राष्ट्रवादी
4. निलेश बारणे – शिवसेना

### प्रभाग क्रमांक - २५
1. राहुल कलाटे –भाजप
2. कुणाल व्हावळकर – भाजप + आरपीआय
3. रेश्मा भुजबळ – भाजप
4. श्रुती वाकडकर – भाजप

### प्रभाग क्रमांक - २६
1. ॲड. विनायक गायकवाड – भाजपा
2. आरती सुरेश चौंधे – भाजपा
3. स्नेहा रणजीत कलाटे – भाजपा
4. संदीप अरुण कस्पटे – भाजपा

### प्रभाग क्रमांक - २७
1. बाबासाहेब त्रिभुवन – भाजप
2. सविता खुळे – भाजप
3. अर्चना तापकीर – भाजप
4. सागर कोकणे – राष्ट्रवादी

### प्रभाग क्रमांक - २८
1. शत्रुघ्न सिताराम काटे – भाजप
2. अनिता संदीप काटे – भाजप
3. कुंदा संजय भिसे – भाजप
4. विठ्ठल उर्फ नाना काटे – राष्ट्रवादी

### प्रभाग क्रमांक - २९
1. रविना अंघोळकर – भाजप
2. शकुंतला दराडे – भाजप
3. शशिकांत कदम – भाजप
4. शाम जगताप – भाजप

### प्रभाग क्रमांक - ३०
1. राजू बनसोडे – राष्ट्रवादी
2. प्रतीक्षा लांघी जवळकर – राष्ट्रवादी
3. स्वाती उर्फ माई काटे – राष्ट्रवादी
4. संजय काटे – भाजप

### प्रभाग क्रमांक - ३१
1. दीप्ती कांबळे – राष्ट्रवादी
2. ज्ञानेश्वर जगताप – भाजप
3. पल्लवी जगताप – भाजप
4. नवनाथ जगताप – भाजप

### प्रभाग क्रमांक - ३२
1. तृप्ती कांबळे – भाजप
2. हर्षल ढोरे – भाजप
3. उज्वला ढोरे – राष्ट्रवादी
4. प्रशांत शितोळे – भाजप



# पुण्यात गुलाल भाजपचाच..!

## महापालिकेवर भाजपची एकहाती सत्ता, 83 जागांवर ऐतिहासिक विजय

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने (भाजप) ऐतिहासिक आणि निर्विवाद विजय मिळवत शहरावर आपली एकहाती सत्ता प्रस्थापित केली आहे. काही प्रभागांमध्ये मतमोजणी अद्याप सुरू असली तरी आतापर्यंतच्या स्पष्ट निकालांनुसार भाजपने तब्बल ८३ जागांवर विजय मिळवला असून, पुण्यात "गुलाल भाजपचाच" अशीच राजकीय स्थिती निर्माण झाली आहे.या निवडणुकीत भाजपने विकास, स्थैर्य आणि शहराच्या भविष्यासाठी ठोस नियोजन या मुद्द्यांवर भर देत मतदारांचा विश्वास संपादन केला. महापालिकेतील मागील कारकिर्दीत राबवलेले पायाभूत सुविधा प्रकल्प, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, तसेच स्मार्ट सिटी संकल्पनेतील कामांचा फायदा भाजपला झाल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. दुसरीकडे, विरोधकांना मात्र मोठा फटका बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ २१ जागा, तर काँग्रेसला ८ जागांवर समाधान मानावे लागले आहे. विशेष म्हणजे शिवसेनेचे उद्धव ठाकरे गट आणि शिंदे गट या दोन्ही गटांना एकही जागा मिळवता आलेली नाही. त्यामुळे पुण्यासारख्या महत्त्वाच्या शहरात शिवसेनेचे अस्तित्व जवळपास नामशेष झाल्याचे चित्र आहे. या निकालांमुळे राज्याच्या राजकारणातही भाजपची ताकद अधिक वाढली असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी हा निकाल दिशादर्शक मानला जात आहे. भाजपच्या नेत्यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन करताना "हा विजय पुणेकरांच्या विकासाच्या अपेक्षांचा विजय आहे" अशी प्रतिक्रिया दिली आहे. दरम्यान, विजयी उमेदवारांच्या सत्काराचे आणि जल्लोषाचे वातावरण शहरात पाहायला मिळत असून, भाजप समर्थकांनी फटाके फोडून आणि गुलाल उधळून हा विजय साजरा केला आहे.



## पुणे महानगरपालिका वॉर्ड निहाय निवडणूक निकाल 2026

### वॉर्ड क्रमांक 1 विजेत्यांची यादी
अ किरण निलेश जठार भारतीय जनता पक्ष
ब मारुती नाना सांगडेभारतीय जनता पक्ष
क रेखा चंद्रकांत टिंगरे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
ड अनिल बॉबी वसंतराव टिंगरे भाजप

### वॉर्ड क्रमांक 2 विजेत्यांची यादी
अ डॉ. धेंडे सिद्धार्थ यशवंत
ब फरजाना अय्युब शेख
क शितल अजय सावंत
ड सुनील विजय टिंगरे

### वॉर्ड क्रमांक 3 विजेत्यांची यादी
अ राहुल कोंडीराम भंडारे
ब खोसे श्वेता गलांडे
क मुक्ता अर्जुन जगताप
ड कर्णे गुरुजी बापूराव गंगाराम

### वॉर्ड क्रमांक 4 विजेत्यांची यादी
अ भैय्यासाहेब तुकाराम जाधव
ब सुमन बाळासाहेब पठारे
क संजिला बापूसाहेब पठारे
ड महेंद्र पंढरीनाथ पठारे

### वॉर्ड क्रमांक 5 विजेत्यांची यादी
अ सुनीता गलांडे
ब शितल ज्ञानेश्वर शिंदे
क योगेश तुकाराम मुळीक
ड जे हरद संदीप नामदेव

### वॉर्ड क्रमांक 6 विजेत्यांची यादी
अ ॲड अविनाश राज साळवे
ब श्वेता श्रीशेठ अनिल चव्हाण
क अश्विनी डॅनियल लांडगे
ड संजय शशिकांत भोसले

### वॉर्ड क्रमांक 7 विजेत्यांची यादी
अ सोनाली संतोष लांडगे
ब राजश्री ज्ञानेश्वर काळे
क आदित्य अनिल माळवे
ड रेश्मा अनिल भोसले

### वॉर्ड क्रमांक 8 विजेत्यांची यादी
अ परशुराम वाडेकर सुनीता
ब अर्चना मधुकर मुसळे
क विजय बाबुराव शेवाळे
ड बंडूप्रकाश ज्ञानोबा ढोरे

### वॉर्ड क्रमांक 9 विजेत्यांची यादी
अ स्वप्नाली प्रल्हाद सायकर
ब ज्योती गणेश कलमकर
क अमोल रतन बालवडकर
ड बाबुराव दत्तोबा चांदेरे

### वॉर्ड क्रमांक 10 विजेत्यांची यादी
अ किरण दगडेपाटील
ब श्रद्धा अशोक प्रभुणे
क अल्पना गणेश वर्पे
ड दिलीप वेडेपाटील

### वॉर्ड क्रमांक 11 विजेत्यांची यादी
अ दीपक मानकर
ब छाया अजय मारणे
क वैशाली राजेंद्र मराठे
ड ॲड रामचंद्र चंदूशेठ आत्माराम कदम

### वॉर्ड क्रमांक 12 विजेत्यांची यादी
अ हर्षाली दिनेश माथवड
क मुरलीधर मोहोळ
ड पृथ्वीराज शशिकांत सुतार

### वॉर्ड क्रमांक 13 विजेत्यांची यादी
अ दीपक पोटे
ब माधुरी श्रीराम सहस्रबुद्धे
क मंजुश्री संदीप खर्डेकर
ड जयंत गोविंद भावे

### वॉर्ड क्रमांक 14 विजेत्यांची यादी
अ स्वाती अशोक लोखंडे
ब निलिमा दाताात्रय खाडे
क ज्योत्स्ना गजानन एकाबोटे
ड सिद्धार्थ पद्माकर अनिल शिरोळे

### वॉर्ड क्रमांक 7 विजेत्यांची यादी
अ नारायण रासने हेमंत
ब ॲड गायत्री रत्नदीप खडके
क मुक्ता शैलेश टिळक
ड राजेश तुकाराम येनापुरे

### वॉर्ड क्रमांक 8 विजेत्यांची यादी
अ पल्लवी चंद्रशेखर जावळे
ब रवींद्र हेमराज धंगेकर
क सुजाता सदानंद शेट्टी
ड योगेश दत्तात्रय समेळ

### वॉर्ड क्रमांक 17 विजेत्यांची यादी
अ लक्ष्मी उदयकांत आंदेकर
ब सुलोचना तेजेंद्र कोंढरे
क श्री आंदेकर वनराज सूर्यकांत
ड विशाल गोरख धनावडे

### वॉर्ड क्रमांक 18 विजेत्यांची यादी
अ विजयालक्ष्मी मोतीलाल हरिहर
ब आरती सचिन कोंढरे
क अजय पांडुरंग खेडेकर
ड अभय थोरात सम्राट

### वॉर्ड क्रमांक 19 विजेत्यांची यादी
अ रमेश बागवे अविनाश
ब मनीषा संदीप लडकट
क अर्चना तुषार पाटील
ड शेख रफिक अब्दुल रहीम

### वॉर्ड क्रमांक 20 विजेत्यांची यादी
अ प्रदीप मच्छिंद्र गायकवाड
ब चांदबी हाजी नदाफ
क दयाराम राजगुरू लताबाई
ड अरविंद शिंदे

### वॉर्ड क्रमांक 21 विजेत्यांची यादी
अ नवनाथ विठ्ठल कांबळे
ब लता विष्णू धायरकर
क मंगला प्रकाश मंत्री
ड उमेश ज्ञानेश्वर गायकवाड

### वॉर्ड क्रमांक 22 विजेत्यांची यादी
अ चेतन विठ्ठल तुपे
ब निलेश मगर हेमलता
क संदीप कोद्रे चंचला
ड गायकवाड सुनील बंदुतात्या

### वॉर्ड क्रमांक 23 विजेत्यांची यादी
अ योगेश दत्तात्रय ससाणे
ब वैशाली सुनील बनकर
क उज्वला सुभाष जंगले
ड मारुती आबा तुपे

### वॉर्ड क्रमांक 24 विजेत्यांची यादी
अ अशोक धाकू कांबळे
ब रुक्साना शमसुद्दीन इनामदार
क आनंद अण्णा अलकुंटे

### वॉर्ड क्रमांक 25 विजेत्यांची यादी
अ धनराज बाबुराव घोगरे
ब मुरलीधर पुंडे कालिंदा
क जगताप रत्नप्रभा सुदाम
ड प्रशांत सुदाम जगताप

### वॉर्ड क्रमांक 26 विजेत्यांची यादी
अ प्राची आशिष आल्हाट
ब प्रमोदनाना वसंत भानगिरे
क नंद नारायण लोणकर
ड संजय तात्या गुलाब घुले

### वॉर्ड क्रमांक 27 विजेत्यांची यादी
अ ॲड हाजी गफूर पठाण
ब परवीन हाजी फिरोज
क अनिस सुंडके हमीदा
ड बाबर साईनाथ संभाजी

### वॉर्ड क्रमांक 28 विजेत्यांची यादी
अ कविता भरत वैरागे
ब श्रीनाथ यशवंत भिमाले
क राजश्री अविनाश शिळीमकर
ड प्रवीण माणिकचंद चोरबेले

### वॉर्ड क्रमांक 29 विजेत्यांची यादी
अ सरस्वती शेंडगे
ब महेश नामदेव लडकट
क स्मिता वस्ते
ड धीरज रामचंद्र घाटे

### वॉर्ड क्रमांक 30 विजेत्यांची यादी
अ आनंद रमेश रिठे
ब प्रिया शिवाजी गडदे
क अनिता संतोष कदम

### वॉर्ड क्रमांक 31 विजेत्यांची यादी
अ सुशील शिवराम मेंगडे
ब लक्ष्मी देवराम दुधाणे
क चौधरी वृषाली दत्तात्रय
ड राजाभाऊ किसन बराते

### वॉर्ड क्रमांक 32 विजेत्यांची यादी
अ दिलीप प्रभाकर बराते
ब सायली रमेश वांजळे
क दिपाली प्रदीप बाबा धुमाळ
ड सचिन शिवाजीराव दोडके

### वॉर्ड क्रमांक 33 विजेत्यांची यादी
अ कृष्णा चरवड हरिदास
ब हेमाराजश्री दिलीप नवले
क नीता अनंत दांगट
ड राजू मुरलीधर लायगुडे

### वॉर्ड क्रमांक 34 विजेत्यांची यादी
अ ॲड प्रसन्नदादा घनशाम जगताप
ब ज्योती किशोर गोसावी
क मंजुषा दीपक नागपूर</td>
ड श्रीकांत शशिकांत जगताप

### वॉर्ड क्रमांक 35 विजेत्यांची यादी
अ दिशा राहुल माने
ब आबा वसंतराव बागुल
क अश्विनी नितीन कदम
ड महेश नरसिंग वाबळे

### वॉर्ड क्रमांक 36 विजेत्यांची यादी
अ अनुसया अभिमान चव्हाण
ब आबा राजेंद्र वाय शिलेमकर
क मानसी मनोज देशपांडे

### वॉर्ड क्रमांक 37 विजेत्यांची यादी
अ वर्षा भीमा साठे
ब रुपाली दिनेश धाडवे
क ओसवाल बालाप्रमोद प्रेमचंद

### वॉर्ड क्रमांक 38 विजेत्यांची यादी
अ बबनराव धनकवडे दत्तात्रय
ब राणी रायबा भोसले
क मनीषाताई राजाभाऊ कदम
ड विठ्ठलराव कदम प्रकाश

### वॉर्ड क्रमांक 39 विजेत्यांची यादी
अ बाळाभाऊकिशोर उत्तम धनकवडे
ब सागर भागवत अश्विनी
क वर्षा विलास तापकीर
ड विशाल विलास तांबे

### वॉर्ड क्रमांक 40 विजेत्यांची यादी
अ युवराज संभाजी बेलदरे
ब अमृता अजित बाबर
क स्मिता सुधीर कोंढरे
ड वसंत कृष्ण मोरे

### वॉर्ड क्रमांक 41 विजेत्यांची यादी
अ विरसेन बापू जगताप
ब संगीता राजेंद्र ठोसर
क वृषाली सुनील कामठे
ड रंजना कुंडलिक टिळेकर